रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २५०
www.ramprahar.com

शुक्रवार, २९ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## घाबरवणे-धमकावणे ही काँग्रेसची संस्कृती -पीएम मोदी



**नवी दिल्ली** : काही विशिष्ट गटाच्या लोकांकडून न्यायसंस्थेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे पत्र देशातील ६०० वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांना लिहिले. यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे. इतरांना घाबरवणे-धमकावणे ही काँग्रेसची जुनी संस्कृती आहे, अशी टीका पंतप्रधान मोदींनी केली. त्यांनी एक्स हँडलवर एक पोस्ट शेअर करीत आपले मत नोंदवले आहे. ते म्हणाले, काँग्रेसने घाबरवण्याची आणि धमकावण्याची संस्कृती जोपासली. पाच दशकापूर्वी ते न्यायपालिकेच्या कटिबद्धतेबद्दल बोलत होते. त्यांना निलाजरेपणाने स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांची कटिबद्धता हवी असते. राष्ट्राप्रती मात्र त्यांना काहीच देणेघेणे नसते. १४० कोटी भारतीयांनी त्यांना नाकारले तर आश्चर्य वाटणार नाही. **(सविस्तर वृत्त पान २ वर..)**

## अंतरंग

खालापुरातील आत्करगाव येथे गोधनाची कत्तल/२

रेवदंड्याच्या श्रावणी घरतची अग्निवीर म्हणून निवड/५

नागोठण्यात रंगणार दिवस रात्र क्रिकेट स्पर्धा/८

# शिवसेनेची पहिली यादी जाहीर

## आठ उमेदवारांचा समावेश; मावळमधून श्रीरंग बारणेंना पुन्हा संधी




**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने लोकसभा निवडणुकीसाठी आपली पहिली यादी गुरुवारी (दि. २८) जाहीर केली. यामध्ये आठ उमेदवारांचा समावेश आहे.

शिवसेनेने जाहीर केलेल्या यादीत मावळ लोकसभा मतदारसंघातून श्रीरंग बारणे, कोल्हापूरमधून संजय मंडलिक, हातकणंगलेतून धैर्यशील माने, मुंबई दक्षिण मध्यमधून राहुल शेवाळे, रामटेकमधून राजू पारवे, हिंगोलीतून हेमंत पाटील, बुलडाण्यातून प्रतापराव जाधव आणि शिर्डीतून सदाशिव लोखंडे यांची नावे आहेत. दरम्यान, या यादीत रामटेकचे विद्यमान खासदार कृपाल तुमाने यांच्याऐवजी राजू पारवे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

राज्यातील लोकसभेच्या ४८ जागांसाठी भाजपने सर्वाधिक २४ उमेदवार जाहीर केले आहेत. त्यानंतर काँग्रेसने १२, ठाकरे गटाने १७, तर राष्ट्रवादीने दोन उमेदवार जाहीर केले आहेत. याशिवाय वंचित बहुजन आघाडीने आठ उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यानंतर आता शिवसेनेनेही आपली पहिली यादी जाहीर करीत आठ शिलेदारांना रिंगणात उतरवले आहे.

महाविकास आघाडीकडून काँग्रेसने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत कोल्हापूर घराण्याच्या गादीचे वारस छत्रपती शाहू महाराजांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे कोल्हापुरात शाह महाराजांविरुद्ध उमेदवार कोण असणार याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. शिवसेनेकडून कोल्हापूरसाठी संजय मंडलिक यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. त्यामुळे कोल्हापूरमध्ये यंदा शाहू महाराज विरुद्ध संजय मंडलिक असा सामना पहायला मिळणार आहे.

# संजय राऊत किती खोटं बोलणार?

### पाठीत सुरा खुपसणारा फोटो पोस्ट करीत प्रकाश आंबेडकरांचा हल्लाबोल






**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि ठाकरे गटामध्ये जागावाटपावरून रस्सीखेच सुरू आहे. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीने 'एकला चलो रे'ची भूमिका घेत उमेदवार जाहीर केले. या निर्णयावरून ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी नाराजी व्यक्त केली होती. त्याला प्रत्युत्तर देताना वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी पाठीत सुरा खुपसणाऱ्या एका व्यक्तीचा फोटो पोस्ट करीत किती खोटं बोलणार, असा सवाल राऊतांना केला आहे.

महाविकास आघाडीमध्ये जमत नसल्याने प्रकाश आंबेडकर यांनी आपल्या आठ उमेदवारांची घोषणा केली. यावर नाराजी व्यक्त करीत ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी, प्रकाश आंबेडकर यांना आम्ही अकोल्यासह पाच जागा देण्यास तयार झालो होतो. आज जर चर्चा पुढे गेली असती, तर सहावी जागाही कदाचित त्यांना दिली असती हे आम्ही तीन पक्षांनी ठरवले होते. काहीही झाले तरी प्रकाश आंबेडकर यांना आपल्याबरोबर घ्यायचे असे आम्ही ठरवले होते. आमची त्यांच्याशी अजूनही चर्चा चालू आहे, असे म्हटले होते.

यानंतर प्रकाश आंबेडकर यांनी संजय राऊत यांच्यावर एक्स अकाउंटवरून हल्लाबोल केला आहे. आंबेडकर यांनी राऊतांवर खोटे बोलल्याचा आरोप केला आहे. संजय राऊत किती खोटं बोलणार? तुमची आणि माझी मते सारखीच असतील, तर तुम्ही आम्हाला बैठकीला का बोलावत नाही? फोर सीझन्स हॉटेलमध्ये ६ मार्चला झालेल्या बैठकीनंतर तुम्ही आमच्या कोणत्याही प्रतिनिधीला का बोलावले नाही? वंचितला आमंत्रण न देता आजही बैठक का घेत आहात? सहयोगी असून तुम्ही पाठीवर वार केलेत! सिल्व्हर ओक येथील मीटिंगमध्ये तुमचे वागणे कसे होते हे आम्हाला माहीत आहे. अकोल्यात आमच्या विरोधात उमेदवार उभा करण्याचा मुद्दा तुम्ही उपस्थित केला हे खरे नाही का? तुम्ही कोणत्या प्रकारचे नाते निर्माण करीत आहात? एकीकडे ते युतीचा आभास दाखवत आहेत, तर दुसरीकडे आम्हाला पाडण्याचे कारस्थान करीत आहेत. हे तुमचे विचार आहेत?, असे म्हणत आंबेडकर यांनी राऊतांचा समाचार घेतला आहे.

आपल्या पोस्टमध्ये पाठीत सुरा खुपसणाऱ्या एका व्यक्तीचा फोटोदेखील आंबेडकर यांनी दाखवला आहे. या फोटोमध्ये सुरा खुपसलेल्या व्यक्तीवर वंचित, तर हल्ला करणाऱ्या हातावर संजय राऊत असे लिहिलेले आहे.

महाविकास आघाडीत दाखल होण्याच्या प्रक्रियेत असताना प्रकाश आंबेडकर हे समोरून हवा तसा प्रतिसाद मिळत नसल्याने त्रस्त होते. त्यातच राऊतांकडून सातत्याने होणाऱ्या विधानांवरून ते आता संतापल्याचे चित्र आहे.

# काँग्रेससह महाविकास आघाडीला धक्का!

## रामटेकच्या उमेदवार रश्मी बर्वेंचे जात वैधता प्रमाणपत्र रद्द



**नागपूर : प्रतिनिधी**

काँग्रेसच्या रामटेक लोकसभा मतदारसंघातील उमेदवार रश्मी बर्वे यांचे जात वैधता प्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे काँग्रेससह महाविकास आघाडीला धक्का बसला आहे.

ऐन निवडणुकीच्या रणधुमाळीत हा निर्णय समोर आल्याने काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे यांची मोठी अडचण झाली आहे. जात वैधता प्रमाणपत्रावर घेतलेल्या आक्षेपावर बर्वे यांनी कायदेशीर लढाई लढण्याचा निश्चय केला होता, मात्र आता जात पडताळणी समितीने घेतलेल्या निर्णयानंतर पुढे काय करायचे असा पेच बर्वे आणि काँग्रेससमोर निर्माण झाला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २७ मार्च होती. त्यामुळे बर्वे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केलेला. हा अर्ज दाखल करताना त्यांनी रामटेकमध्ये मोठे शक्तीप्रदर्शन केले, मात्र अर्ज दाखल केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी जात वैधता पडताळणी समितीने बर्वे यांचे जात वैधता प्रमाणपत्र रद्द ठरवले आहे. या निर्णयामुळे बर्वे यांचा उमेदवारी अर्ज रद्दबातल ठरला आहे. दरम्यान, रश्मी बर्वे यांचे पती श्यामकुमार बर्वे यांनीही अर्ज दाखल केलेला असल्यामुळे ते आता रामटेकमधून काँग्रेसचे उमेदवार असण्याची चिन्हे दिसत आहेत.

# राऊत-पटोलेंमध्ये जुंपली



**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीत आता जागावाटप आणि उमेदवारीवरून वादविवाद सुरू झाले आहेत. अशाच प्रकारे सांगलीच्या जागेवरून उद्धव ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी काँग्रेसवर टीका करीत भाष्य केले होते. यावर खुर्चीची भीती आम्हाला दाखवू नका, असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राऊतांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

जोपर्यंत आघाडीमध्ये कोणतीही चर्चा होत नाही, तोपर्यंत त्या जागेबद्दल परस्पर काही जाहीर करता येणार नाही. सहमतीने हे सर्व निर्णय घ्यायचे असतात. त्यालाच आघाडीचा धर्म म्हणतात. त्याला पुन्हा ओपन करून उद्धव ठाकरेसाहेबांनी पुनर्विचार करावा. भिवंडीच्या जागेवरसुद्धा शरद पवारसाहेबांनी ती जागा काँग्रेसला द्यावी या संदर्भातील आमची भूमिका असल्याचे नाना पटोले म्हणाले. ज्या जागा आपण जिंकू शकतो त्याच जागा आपण घेतल्या पाहिजेत, असेदेखील त्यांनी म्हटले. त्यामुळे येत्या काळात काय होते याकडे लक्ष असेल.

## निवडक

### दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या ईडी कोठडीत वाढ



**नवी दिल्ली** : मद्य धोरण घोटाळाप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या ईडी कोठडीत दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने १ एप्रिलपर्यंत वाढ केली आहे. केजरीवाल यांना २१ मार्च रोजी ईडीकडून अटक करण्यात आली होती. यानंतर न्यायालयाने त्यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली. त्यांची ईडी कोठडी संपत असल्याने पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले असता या कोठडीत वाढ झाली आहे.

### मुंबई विमानतळावर पकडले साडेतीन कोटींचे सोने

**मुंबई** : गेल्या तीन दिवसांत मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमा शुल्क विभागाने केलेल्या कारवाईदरम्यान साडेतीन कोटी रुपयांचे सोने जप्त केले आहे. दुबई, सिंगापूर, अबुधाबी येथून प्रामुख्याने या सोन्याची तस्करी मुंबईत झाल्याची माहिती आहे. सोन्याची पेस्ट आणि पावडर या रूपात सोने भारतात आणण्यात आले होते, तर परदेशातून आणलेले काही मोबाईल फोनही अधिकाऱ्यांनी जप्त केले आहेत.

# अभिनेते गोविंदा शिवसेनेत दाखल

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून स्वागत



**मुंबई : प्रतिनिधी**

अभिनेते आणि काँग्रेसचे माजी खासदार गोविंदा आहुजा यांनी गुरुवारी (दि.२८) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. वर्षा निवासस्थानी झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमात मुख्यमंत्री शिंदे यांनी भगवा झेंडा हाती देत गोविंदा यांचे स्वागत केले.

मागील काही दिवसांपासून अभिनेते गोविंदा हे राजकारणात पुन्हा प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. त्यानुसार गोविंदा यांनी शिवसेनेत प्रवेश केला. या वेळी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आज शिवजयंतीच्या पवित्र दिनी आपले सगळ्यांचे लाडके आणि लोकप्रिय अभिनेते गोविंदा हे शिवसेनेत आले आहेत. ते डाऊन टू अर्थ आहेत. मी त्यांचे मनापासून स्वागत करतो आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही देतो.

मुंबईत होत असलेल्या विकासकामांचा प्रभाव गोविंदा यांच्यावर पडला. महाराष्ट्रासह देशभरात विकासकामे सुरू आहेत. त्यातून सकारात्मक भावनेतून गोविंदा हे आपल्यासोबत आलेत. फिल्म इंडस्ट्री ही खूप मोठी आहे. लाखो लोक त्यावर अवलंबून आहेत. या फिल्म इंडस्ट्रीसाठी गोविंदा यांना काम करायचे आहे. सरकार आणि फिल्म इंडस्ट्री यांच्यातील दुवा म्हणून गोविंदा काम करतील. कुठल्याही अटीशर्थीशिवाय त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

अभिनेता गोविंदा यांनी म्हटले की, मी २००४ ते २००९ सुरुवातीला राजकारणात होतो. बाहेर पडल्यावर कदाचित मी पुन्हा राजकारणात दिसणार नाही असे वाटले, परंतु २०१० ते २०२४ या १४ वर्षांच्या वनवासानंतर जिथे रामराज्य आहे त्याच शिवसेना पक्षात मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात आलोय. आपल्या सर्वांच्या मनापासून शुभेच्छा आहेत. मी प्रामाणिकपणे माझ्यावरील जबाबदारी पार पाडेन.

# मंत्री दिलीप वळसे-पाटील यांना दुखापत

**पुणे : प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेसचे बडे नेते आणि राज्याचे सहकारमंत्री दिलीप-वळसे पाटील यांना गंभीर दुखापत झाली आहे. ते अंधारात लाईट सुरू करायला जात असताना पाय घसरून पडले आणि त्यांना दुखापत झाली. त्यांनी स्वतः एक्स पोस्ट करीत या विषयीची माहिती दिली आहे.

दिलीप वळसे-पाटील यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलेय की, काल रात्री राहत्या घरात पडल्यामुळे मला फ्रॅक्चर झाले असून डॉक्टरांच्या सल्ल्याने पुढील उपचार सुरू आहेत. काही काळ पूर्ण विश्रांती घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. लवकरच बरा होऊन आपल्या समवेत सामाजिक कामात सक्रिय होईन. दरम्यान, वळसे-पाटील यांच्यावर पुण्यातील औंध येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



**पनवेल : बजरंग दलाचे तळोजा मजकूर येथील कार्यकर्ते गुरूनाथ मुंबईकर यांच्या घरी तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी तेथे जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. त्यांच्यासमवेत माजी नगरसेवक हरेश केणी उपस्थित होते.**

# पारा चढला! वाढत्या तापमानामुळे अंगाची काहिली

**अलिबाग : प्रतिनिधी**

मागील चार दिवसांपासून सूर्यनारायणाने जणू आग ओकायला सुरुवात केली आहे. त्यामुळे रायगडकरांना उन्हाच्या तीव्र झळांना सामोरे जावे लागत आहे. उन्हाचा पारा अचानक वाढल्याने अंगाची लाही-लाही होत आहे. नागरिक उष्णतेने हैराण झाले आहेत. शरीराला थंडावा मिळावा म्हणून लोक शीतपेयांचा आधार घेत आहेत.

सकाळी ९ वाजल्यापासून ऊन तापायला सुरुवात होते. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास उन्हाचा परमोच्च बिंदू गाठला जातो. त्यामुळे दुपारच्या वेळेत शहरातील रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येतो. मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा रायगडकरांसाठी तापदायक ठरला आहे. दिवसभर वाऱ्याचा वेग काहीसा टिकून राहिल्याने दिलासा



मिळाला, मात्र काही भागात वाऱ्याचा वेग अत्यल्प असल्याने उकाड्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. तीन ते चार दिवसांपासून संध्याकाळीही वातावरणात उष्मा राहत असल्याने उकाड्याचा त्रास वाढत आहे. संपूर्ण आठवडाभर पारा ३५ अंशाच्या पुढेच स्थिरावत असल्याने उन्हाची तीव्रता कायम आहे.

### दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट

चढलेल्या पाऱ्याने कमालीचा उकाडा वाढला आहे. त्यामुळे दुपारच्या वेळी रस्ते नागरिकांविना ओस पडलेले दिसत आहेत. सूर्याचा वाढता कहर पाहून नागरिकांनी घराबाहेर न पडणेच पसंत केले आहे. या वाढत्या तापमानाचा परिणाम शेती कामावरही झाला आहे. शेतकरी पहाटे किंवा सायंकाळी कामे करताना दिसत आहेत. ट्रकचालकही सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत रस्त्याच्या कडेला झाडांच्या सावलीखाली आराम करताना दिसतात, तर शहरातील लोकही संध्याकाळी ६ वाजल्यानंतर घराबाहेर पडतात.

बदलत्या हवामानामुळे नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होऊ लागला आहे. उन्हाची तीव्रता वाढल्याने उकाड्यापासून दिलासा मिळविण्यासाठी शीतपेय, थंड पाणी, आईस्क्रीम, कुल्फीला नागरिकांकडून पसंती दिली जात आहे, मात्र थंड पदार्थांचे सेवन सर्दी-पडसे, घसा खवखवणे यासारख्या शारीरिक तक्रारींना कारणीभूत ठरू शकतात, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

**सध्या नागरिकांनी शरीरास थंडावा देणारी फळे म्हणजेच शहाळे, कलिंगड, द्राक्ष, केळी, सीताफळ यांचे मोठ्या प्रमाणावर सेवन करावे. बर्फाचा गोळा, आईस्क्रीम, शीतपेय हे पदार्थ आजाराला आमंत्रण देणारे ठरू शकतात. त्यामुळे अशा पदार्थांचे सेवन टाळावे.**


**-ज्ञानेश्वर अरसळे, वैद्यकीय अधिकारी**

# लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आयोगाकडून जारी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर सर्वच राजकीय पक्षांनी उमेदवारांची घोषणा सुरू केली आहे. अद्यापही आघाडी आणि युतीमध्ये काही जागांवरून चर्चा सुरू आहेत. दरम्यान, निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना निवडणूक आयोगाकडून जारी करण्यात आली आहे. १२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील ८८ लोकसभा मतदारसंघांत दुसऱ्या टप्प्यात मतदान पार पडणार आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाने वेळापत्रक जारी केले आहे.

### १२ राज्यांमधील ८८ जागांवर रणधुमाळी




दुसऱ्या टप्प्यात केरळमध्ये सर्वाधिक २० जागांवर, कर्नाटक १४, राजस्थान १३, महाराष्ट्र व उत्तर प्रदेश प्रत्येकी आठ, मध्य प्रदेश सात, आसाम व बिहार प्रत्येकी पाच, छत्तीसगड व पश्चिम बंगाल प्रत्येकी तीन आणि जम्मू काश्मीर, त्रिपुरा व मणिपूर प्रत्येकी एका जागेसाठी मतदान होणार आहे.

दुसऱ्या टप्प्यातील जागांसाठी गुरुवार (दि.२८) पासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. २६ एप्रिलला दुसऱ्या टप्प्याचे मतदान होणार आहे. यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची ४ एप्रिल ही अखेरची तारीख आहे, तर ८ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे.

दुसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातील अकोला, अमरावती, बुलढाणा, हिंगोली, नांदेड, परभणी, वर्धा आणि यवतमाळ-वाशिम या जागांसाठी मतदान होणार आहे.

# घाबरवणे, धमकावणे काँग्रेसची संस्कृती

## सरन्यायाधीशांना लिहिलेल्या पत्रावर पंतप्रधान मोदींची प्रतिक्रिया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काही विशिष्ट गटाच्या लोकांकडून न्यायसंस्थेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे पत्र देशातील ६०० वकिलांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांना लिहिले. हे पत्र लिहिल्यानंतर काही तासांतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर भाष्य केले आहे. या पत्राच्यानिमित्ताने पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर निशाणा साधला आहे. इतरांना घाबरवणे, धमकावणे ही काँग्रेसची जुनी सवय आहे, अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लॉ बिट या एक्स हँडलवरील एक पोस्ट शेअर केली आहे आणि त्यावर आपले मत नोंदवले. ते म्हणाले, काँग्रेसने घाबरवण्याची आणि धमकावण्याची संस्कृती जोपासली. पाच दशकांपूर्वी ते न्यायपालिकेच्या कटिबद्धतेबद्दल बोलत होते. त्यांना निलाजरेपणाने स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांची कटिबद्धता हवी असते. राष्ट्राप्रती मात्र त्यांना काहीच देणे-घेणे नसते. १४० कोटी भारतीयांनी त्यांना नाकारले तर आश्चर्य वाटणार नाही.

काही विशिष्ट लोकांचा समूह न्यायव्यवस्थेवर दबाव आणण्याचा, न्यायालयीन प्रक्रियेवर प्रभाव टाकण्याचा आणि विचित्र तर्क आणि राजकीय अजेंड्याच्या आधारावर न्यायालयांची बदनामी करण्याचा प्रयत्न करीत आहे, असा आरोप करून देशातील ६०० वकिलांनी सर्वोच्च न्यायालयचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्यासमोर पत्राद्वारे चिंता व्यक्त केली आहे. ज्येष्ठ विधिज्ञ हरिश साळवे आणि इतर ६०० वकिलांनी असा आरोप केल्यामुळे देशभरात एकच खळबळ उडाली आहे. विशेष करून लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मागच्या काही काळात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल दिले आहेत. यातील अनेक निकाल हे राजकारणाशी निगडित होते.

वकिलांनी या पत्रात म्हटले की, राजकीय नेते आणि भ्रष्टाचाराची प्रकरणांमध्ये गुंतलेल्या लोकांकडून न्यायालयावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला जात आहे. हेतूपुरस्सर न्यायव्यवस्थेवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न एका गटाकडून केला जात आहे. त्यामुळे न्यायाव्यवस्थेच्या कार्याचे वैशिष्ट असलेले विश्वास आणि सौहार्दाचे वातावरण बिघडत आहे. राजकीय आणि भ्रष्टाचाराच्या प्रकणांमध्ये गुंतलेल्या लोकांकडून न्यायव्यवस्थेवर दबाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे न्यायालयाला धमकावले जात आहे, तसेच लोकशाही व्यवस्थेला धोका निर्माण होत आहे, अशी चिंता या पत्रातून व्यक्त करण्यात आली.

# खालापूर आत्करगाव येथे गोधनाची कत्तल

## गायीचे गर्भ सापडले मृतावस्थेत

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील आत्करगाव नाक्यावरील क्रिकेटच्या मैदानावर शिवजयंतीच्या आदल्या रात्री तीनहून अधिक गोधनाची हत्या करून मांस चोरी करण्याची घटना घडली उघडकीस आली आहे. यामध्ये गाभण गायीचे अर्धवट वाढ झालेले गर्भ मृतावस्थेत सापडल्याने हळहळ व्यक्त होत आहे. हिंदू संघटनांनी संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

खालापूर तालुक्यात शिवजयंतीच्या पूर्वरात्री अंधाराचा फायदा घेत तीनहून अधिक गोधनाची हत्या करण्यात आली आहे. शिवजयंतीच्या दिवशी दुपारी ही घटना ग्रामस्थांना समजल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. सर्व प्रकार लक्षात आल्यानंतर




खोपोली पोलीस स्टेशनशी संपर्क साधत पोलिसांना बोलाविण्यात आले. घटनास्थळी खोपोली पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांनी माहिती घेत घटनास्थळी सापडलेल्या संशयास्पद वस्तू आणि गोधनाच्या शरीराचे टाकलेल्या अवयवांचे नमुने पुढील तपासासाठी पाठविण्यात आले आहे. या ठिकाणी अर्धवट वाढ झालेल्या गाईचा गर्भ मृतावस्थेत सापडले.

घटना स्थळावर जि. प. माजी सभापती व भाजप नेते नरेश पाटील, संदीप पाटील, युवा मोर्चा नेते प्रसाद पाटील यांसह परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यापूर्वीही अशा घटना घडल्याने गोधनाच्या सुक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे गोधन चोरांचा पोलिसांनी बंदोबस्त करावा आणि कठोर कारवाई करावी अशी मागणी भाजप नेते नरेश पाटील वमाजी उपसरपंच संदीप पाटील यांनी केली आहे.

या वेळी ग्रामपंचायतीचे उपसरपंच गणेश पाटील, बजरंग दलाचे रुपेश मेस्त्री, हेमंत पाटील यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# रायगड रोप वे होणार अधिक सुरक्षित



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड रोप-वेमधून प्रवास करणार्या प्रवाशांच्या अधिक सुरक्षिततेसाठी मिलेनियम रोप-वे कंपनीने स्वित्झर्लंडमधील इमॉस कंपनीशीही नुकताच सहकार्याचा करार केला आहे.

रायगड किल्ल्यावर रोप वेची सुविधा पुरविणाऱ्या मिलेनियम रोप वे कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र जोग यांनी याबाबतची माहिती पत्रकार परिषदेत नुकतीच दिली.

राजेंद्र जोग म्हणाले, रायगड रोप वेमधून गेल्या २८ वर्षांत ३५ लाख प्रवाशांची वाहतूक झाली आहे. रोप वे रेस्न्यू आणि इव्हॅक्युएशन तंत्रज्ञानामध्ये जगात इमॉस आघाडीवर आहे. ६०हून अधिक देशांत त्यांची सेवा पुरविली जाते. रोप वे क्षेत्रात वेगाने बदल होत आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून इमॉसबरोबर करार करण्यात आला आहे. त्यांच्या तंत्रज्ञांकडून देखभाल दुरूस्तीबरोबच जागतिक दर्जाचे प्रशिक्षणही मिळणार आहे. त्यामुळे रोप वे आणखी सुरक्षित होणार आहे.

# रोहित पवार हे बालवाडी मित्र मंडळाचे प्रमुख

## खासदार सुनील तटकरे यांचा पलटवार

**धाटाव : प्रतिनिधी**

मुरूड येथे बुधवारी शेकापच्या वतीने आयोजित निर्धार मेळाव्यात शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीका केली होती. रोहित पवार यांव्या टिकेला प्रत्युत्तर देत खासदार सुनील तटकरे म्हणाले की, रोहित पवार यांनी मला राजकारण शिकवू नये, मी सोन्याचा चमचा घेऊन जन्मालेलो नाही. रोहित पवार हे बालवाडी मित्र मंडळाचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांना बालबुद्धीपेक्षा जास्त सुचत नाही, अशा शब्दांत टीका केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रायगड लोकसभेसाठी महायुतीचे उमेदवार म्हणून खासदार सुनील तटकरे यांचे नाव घोषित केले. त्यानिमित्ताने गुरुवारी (दि.२८) रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांचे खासदार सुनील तटकरे यांनी सपत्निक दर्शन घेतले.



अधिक माहिती देताना त्यांनी, लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवास्थानी बैठक पार पडली. या बैठकीत पालकमंत्री ना. उदय सामंत, शिवसेनेचे प्रतोद आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरात, जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर, युवा प्रमुख विकास गोगावले आदी प्रमुख मंडळी व स्वतः उपस्थित होते. कोकणात माजी मंत्री रामदास कदम यांनी दोन जाहीर सभा घेऊन प्रचाराची धुमडक्यात सुरुवात केली. शेकापला लागलेली घरघर थांबविण्यासाठी त्यांच्या नेत्यांना माझ्याबद्दल बोलल्याशिवाय काही साध्य करता येणार नाही. रायगड जिल्ह्यातून दिवसेंदिवस शेकापचे वर्चस्व कमी होत आहे. शेकाप २०१९पासून लोकसभा निवडणुका लढवत नाही. त्यांच्या पक्षात कार्यकर्ते थांबत नाही. या नैराश्यातून शेकाप नेते मंडळी आपल्यावर आरोप करीत असल्याचे ते म्हणाले. रायगड - रत्नागिरी जिल्ह्यातील सुज्ञ मतदार आपल्यासोबत आहे. ४० वर्षांपासून प्रत्येक समाजातील घटकासाठी आपण घेतलेली मेहनत आणि केलेली कामे या माध्यमातून मागच्या निवडणुकीपेक्षा किती तरी फरकाने आपण या वेळी निवडून येऊ, असा दावा खासदार सुनील तटकरे यांनी केला.

# पेणच्या नवघर कोळीवाडा येथे दोन गटांत हाणामारी

## परस्परविरोधी तक्रारी दाखल

**पेण : प्रतिनिधी**

नवघर कोळीवाडा येथे दोन गटात मारहाण झाली असून पेण पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

फिर्यादी (रा.नवघर कोळीवाडा पो.कोप्रोली) व त्यांच्या चार जाऊ व चुलत दिर या मुलासोबत होळीनिमित्त गावातील होळीच्या ठिकाणी गेले असता तेथे १४ आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या जाऊंना बोलल्या की, येथे येण्याचा तुमचा काय संबंध? लाज वाटत नाही का? याबाबत जाब विचारण्यासाठी फिर्यादी गेले असता त्यांनी फिर्यादी व त्यांच्या जाऊ यांना शिविगाळ करून फिर्यादींचे दिरांना मारहाण केली. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या तक्रारीनुसार, फिर्यादी या आरोपींना, तुम्ही होळीचे दर्शनाला का आलात लाजा वाटत नाही, असे बोलल्याचा गैरसमज करून फिर्यादींसोबत वाद घातला. भांडण सोडविण्याकरीता आलेला फिर्यादींच्या मुलांना शिवीगाळ करून मारहाण केली. याबाबत अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक माधुरी घाडगे या करीत आहेत.

# 'जेएसएस'मध्ये पहिल्या प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना सेंटरचे उद्घाटन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

सहाण एकदंत नगर येथे प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचे जिल्ह्यातील पहिले सेंटर सुरू करण्यात आले आहे. या पहिल्या प्रशिक्षण वर्गाचे उद्घाटन गुरुवारी (दि.२८) आले.

सहा दिवसांच्या प्रशिक्षण वर्गामध्ये प्रति विद्यार्थी एकत्रित प्रोत्साहन भत्ता चार हजार रुपयांबरोबरच, मोफत प्रशिक्षण प्रमाणपत्र, विश्वकर्मा किट अथवा व्हाउचर्सबरोबरच पाच टक्के व्याजाने तीन लाखांपर्यंतचे टप्प्याटप्प्याने कर्ज उपलब्ध होणार आहे, अशी माहिती संस्थानचे संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली



प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना हजारो युवकांना रोजगाराची सुवर्ण संधी उपलब्ध करून देणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी योजनेचा फायदा घेऊन नाव नोंदणी करावी असे आवाहन संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैय्या व अध्यक्ष डॉ. नितीन गांधी यांनी केले.

या वेळी उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, रायगड जिल्हा अग्रगण्य बँकेचे प्रमुख विजय कुलकर्णी व कपिदास माने, शिक्षण अधिकारी सुनीता चांदोरीकर, ॲड. नीला तुळपुळे, दत्तात्रेय नाईक, गीतांजली ओक, नरेन जाधव, पल्लवी तुळपुळे आदी उपस्थित होते.

# नवी मुंबई अतिरिक्त आयुक्तपदी सुनील पवार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सांगली, मिरज आणि कुपवाड महापालिकेचे आयुक्त सुनील पवार यांची शासनाने नवी मुंबई मनपाच्या अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती केली आहे. आयुक्त कैलास शिंदे यांनी सुनिल पवार यांच्याकडे अतिरिक्त आयुक्त (१) पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्याचे आदेश दिले आहेत.

यामध्ये मालमत्ता कर, स्थानिक संस्थाकर, जनसंपर्क विभाग, माझी वसुंधरा, घनकचरा, परवाना आदी विभागाचा सामावेश आहे. मालमत्ता कर विभाग हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. यापूर्वी माजी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांच्याकडे हे खाते असताना उपायुक्त दर्जाच्या अधिकारी देण्यात आला नव्हता. त्यामुळे सर्व फाईली प्रशासकीय अधिकारी यांच्याकडून थेट ढोले यांच्याकडे जात होत्या, मात्र माजी आयुक्त राजेश नार्वेकर यांनी अखेरच्या दिवशी उपायुक्त शरद पवार यांच्याकडे उपायुक्त कर (मालमत्ता आणि अन्य कर) अशी जबाबदारी सोपवली आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी संघरत्ना खिल्लारे यांची नवउपआयुक्त म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली आहे. आयुक्त शिंदे यांनी खिल्लारे यांच्याकडे विधी विभाग आणि संचालक, दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवा सुविधा केंद्राचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे.

# शिमगोत्सवानिमित्त श्रीवर्धनमधील वडवली येथे सांस्कृतिक कार्यक्रम

**श्रीवर्धन : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील एक प्रसिद्ध शिमगोत्सव म्हणून ओळख असणाऱ्या वडवली येथे आई जांभूळकरीन देवीच्या उत्सवानिमित्त कोपरा ग्रुप वडवली यांच्या माध्यमातून बुधवारी (दि.२७) रात्री सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कै. वैशाली शशिकांत सुर्वे यांच्या स्मरणार्थ कोपरा ग्रुप वडवली यांच्या विद्यमाने आयोजित रायझिंग स्टार ऑर्केस्ट्राला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



कार्यक्रमात गायक/निवेदक मुकेश उपाध्ये, रवींद्र जाधव, नवीन मोरे, वैभवी कदम, सुप्रभा आरेकर, निर्माता राजू शिंदे, लावणी नृत्यांगना नैना रणदिवे, ज्युनिअर दादा कोंडके नितीन देशमुख, नृत्य दिग्दर्शक जयेश तेलवणे व सहकारी तसेच वाद्यवृंद भारत शेळके, सुमित जंगम, निशांत भालेराव, अलंकार कडू, लाखन आणि ध्वनी-प्रकाश संयोजक गणेश डोलकर यांनी उपस्थित रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

वडवली येथे रविवारी होळी प्रज्वलित करून होलिकोत्सवाला सुरुवात झाली. सोमवारी गावात आई जांभूळकरीन देवीचा पालखी मिरवणूक सोहळा मोठ्या दिमाखात झाला.

# पद्मदुर्ग ढोल ताशा पथकाचे उद्घाटन

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड शहरात व ग्रामीण भागात गणपती उत्सव तसेच राजकीय मिरवणूक, लग्नसमारंभ अशा अनेक कारणासाठी ढोल-ताशा पथकाची नितांत गरज असते. ही गरज ओळखून पद्मदुर्ग ढोल-ताशा पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकाचे उद्घाटन डॉ. राज कल्याणी यांच्या शुभ हस्ते श्रीफळ वाढवून व पुष्पहार अर्पण करून याचे उद्घाटन करण्यात आले.

या पथकाचे अध्यक्ष दत्ता मुंगळे, उपाध्यक्ष नेहा पटेल, सचिव ईशान बागडे व आदित्य पाटील, खजिनदार अंकेष पाटील आहेत, तसेच या पथकात विविध वाद्य वाजवण्यासाठी ३५ सदस्य नियुक्त करण्यात आले आहेत. या वेळी रायगड किल्ल्यामधून आलेली शिवज्योत या ढोल-ताशांच्या गजरात शहरात फिरवण्यात आली.



# पावसाळापूर्व कामांना ३० मेची डेडलाईन; नवी मुंबई महानगरपालिकेच्या बैठकीत सूचना

**नवी मुंबई : बातमीदार**

पावसाळी कालावधीत कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवणार नाही याची काळजी घेऊन आवश्यक पूर्वतयारी करावी आणि ३० मे पर्यंत पावसाळापूर्व कामे पूर्ण करावीत असे निर्देशित करीत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी आढावा बैठकीत दिले.

सध्याचा आचारसंहिता कालावधी लक्षात घेऊन कामे करण्यासाठी आवश्यक परवानग्या घेणेबाबत तातडीने कार्यवाही करावी असे निर्देशित केले. नैसर्गिक नाल्यांच्या प्रवाहात असलेल्या झोपडपट्ट्या स्थलांतरणाबाबतही निर्देशित करण्यात आले. दिघा इलठणपाडा धरणाच्या खाली असणाऱ्या झोपड्यांच्या स्थलांतरणविषयक आवश्यक कार्यवाही करण्याचे या वेळी सूचित करण्यात आले.



महावितरणाची झाकण तुटलेली सबस्टेशन, उघड्या केबल यांची दुरूस्ती तातडीने करण्याचे सूचित करीत विशेषत्वाने मोठ्या ट्रान्सफॉर्मरच्या आसपास असणाऱ्या अस्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याचे आयुक्तांनी सूचित केले. याकरिता किमान आठवड्यातून एकदा त्यांची साफसफाई करण्याची नियमित प्रणाली राबवावी अशाही स्पष्ट सूचना देण्यात आल्या. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आत्यंतिक गरजेशिवाय कोणत्याही नवीन खोदकामाची परवानगी देऊ नये व दिलेल्या परवानग्यांची कामे १५ मे पर्यंत पूर्ण करून ते खोदकाम पूर्ववत केले जाईल याची दक्षता घ्यावी असेही निर्देशित करण्यात आले.

वाहतूक पोलीस विभागाने मांडलेल्या सूचनेनुसार उड्डाणपुलांची कामे जलद पूर्ण करावीत तसेच पावसाळी कालावधीत मोठ्या भरतीच्या काळात अतिवृष्टी झाल्यास पाणी साचण्याच्या संभाव्य जागांवर आवश्यक पम्पिंग मशीन व मनुष्यबळ कार्यान्वित राहील याची दक्षता घेण्याचे आयुक्तांनी सूचित केले. या दृष्टीने पावसाळी कालावधीतील नालेसफाई व गटारे सफाईची कामे काटेकोरपणे व जलद गतीने विहित कालावधीत पूर्ण करण्याचे आयुक्तांनी निर्देश दिले व सर्व पावसाळापूर्व कामांचा स्वत: पाहणी करून आढावा घेणार असल्याचे स्पष्ट केले.

पावसाळा कालावधीत महानगरपालिकेचा मुख्यालयातील मध्यवर्ती नियंत्रण कक्ष तसेच विभागीय नियंत्रण कक्ष आणि अग्निशमन केंद्रातील कक्ष हे २४×७ आवश्यक मनुष्यबळासह व यंत्रसामुग्रीसह सुसज्ञ राहतील याकडे विशेष लक्ष देण्याचे आयुक्तांनी निर्देशित केले. पावसाळी कालावधीतील साथरोग नियंत्रणासाठी तसेच मलेरिया व डेंग्यूसारख्या संभाव्य आजारांबाबत आवश्यक खबरदारी घेण्याच्या सूचना आरोग्य विभागाला करतानाच पुरेसा औषधसाठा करून ठेवण्याबाबत या वेळी सूचना देण्यात आल्या. महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये स्वतंत्र हेल्पलाईन कार्यान्वित करण्याबाबतही कार्यवाहीचे निर्देश यावेळी देण्यात आले. त्याचप्रमाणे या कालावधीत पाण्याच्या शुद्धतेकडेही विशेष लक्ष देण्याचे निर्देशित करण्यात आले. शालेय विभाग तसेच परिवहन सेवा यांनाही दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## दुखवटा

### चिंतामण पाटील



**पेण** : रामवाडीचे रहिवासी चिंतामण पाटील यांचे वयाच्या ८५व्या वर्षी निधन झाले. इंचगिरी सांप्रदायाचे सद्गुरु शंकर महाराज रसाळ यांचे ते पट्टशिष्य होते. इंचगिरी रसाळ सांप्रदायाचे मठाधिपती पांडुरंग महाराज रसाळ यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन परिवाराचे सांत्वन केले. त्यांच्यासमवेत सांप्रदायाचे कोकण सचिव हभप कृष्णा वर्तक हेही होते. चिंतामण सेठ यांनी आपला शेवटचा श्वास सद्गुरु चिंतनात सोडला. त्यांचे बारावे शुक्रवारी (दि.२९) त्यांच्या घरी होईल. त्यांच्या पश्चात चार मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## निवडक

### रसायनीत शिवजयंती उत्साहात



**मोहोपाडा** : महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती गुरुवारी (दि.२८) रसायनी-पाताळगंगा परिसरातील मोहोपाडा, नविन पोसरी, चांभार्ली, कैरे, तळवली, वावेघर, इसांबे या ठिकाणी उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंतीनिमित्त ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मोहोपाडा मुख्य बाजारपेठेतील शिवाजी चौकात शिवभक्तांनी शिवपुतळ्याची स्वच्छता करून पुष्पहार अर्पण करून मनोभावे अभिवादन केले.

### ‘सेंटमेरी’मध्ये मतदान जनजागृती



**उरण** : सेंटमेरी कॉन्व्हेन्ट हायस्कूलमध्ये मंगळवारी (दि.२६) मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे पं. स. गटशिक्षणाधिकारी प्रियांका म्हात्रे, जासई शाळेचे रुपेश पाटील, साधन व्यक्ती मनिषा पाटील, निलम गावंड, ज्योती ठाकूर, हायस्कूलचे चेअरमन फादर मार्शल लोपेस, शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर मेरी, प्रायमरी मुख्याध्यापिका रिबेका डिसोझा, पर्यवेक्षक संगीता पाटील तसेच शाळेतील शिक्षक उपस्थित होते. मतदान जनजागृतीविषयक पथनाट्य विद्यार्थांनी सादर केले. त्यासाठी कांचन पाटील यांचे सहकार्य लाभले.

### रेल्वे अपघातात एकाचा मृत्यू

**मोहोपाडा** : रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत तुराडे गावाजवळ कृष्णा सुरेश कातकरी (वय अंदाजे ३० ते ३५) या व्यक्तीचा रेल्वे अपघातात मृत्यू झाला असून गिरीधर वसंत पाटील यांनी याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात माहिती दिली आहे. ही घटना कळताच रसायनी पोलीस ठाण्याचे मपोसई ढोणे यांनी तत्काळ भेट देऊन झालेल्या घटनेचा आढावा घेतला व मृतदेह शवविच्छेदनाकरिता चौक ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. याबाबत रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली मपोसई ढोणे अधिक तपास करीत आहे.

# पनवेल मनपाची सर्वांत उच्चांकी वसुली

## एक दिवसात तीन कोटींहून अधिक भरणा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मार्चअखेर जवळ आल्याने पनवेल महापालिकेच्या कर संकलन विभागाच्या वतीने वसुलीचा धडाका लावला असून त्यास नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. गुरुवारी (दि.२८)आतापर्यंतची सर्वांत उच्चांकी वसुली झाली असून, तीन कोटी पाच लाख रुपये कराचा भरणा तिजोरीत झाला आहे. यामध्ये खारघरमधून सर्वाधिक मालमत्ता कर भरणा होत आहे. आजवरचा सर्वाधिक म्हणजे १२४.५७ कोटींचा भरणा केवळ खारघर प्रभागातून जमा झाला आहे.



शहराच्या विकासामध्ये मालमत्ता कराचा मोठे योगदान आहे. त्यामुळे कर वसुलीसाठी विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. ज्या थकबाकीदारांना जप्ती पूर्व नोटीसा दिल्या होत्या, अशा थकबाकीदारांकडून मालमत्ता कर वसुलीसाठी सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, कर अधीक्षक महेश गायकवाड तसेच सुनील भोईर यांच्या नेतृत्वाखाली वसुली पथकाच्या माध्यमातून चारही प्रभागातून उच्चांकी वसुली झाली आहे.

सध्या १७ वसुली पथकांच्या माध्यमातून महापालिका कार्यक्षेत्रात वसुली मोहीम सुरू आहे. पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विविध नोडमध्ये सुमारे ४५०हून अधिक जप्तीपूर्वीच्या नोटीसा तसेच १६ वॉरंट नोटीसा थकबाकीदारांना दिल्याने थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. आजवर महापालिकेने सातत्याने सवलती देऊन मालमत्ता कर भरण्याबाबत आवाहन केले आहे, परंतु आता महापालिकेने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. ज्या थकबाकीदारांना जप्ती नोटीसा दिल्या होत्या त्यांना आता वॉरंट नोटीसा देण्याचे काम पालिकेने युद्धपातळीवर सुरू केले आहे, तसेच अटकावणीच्या मोहिमेलाही सुरूवात करण्यात आली आहे. याचा थकबाकीदार यांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात तीन लाख ५० हजार निवासी, बिगर निवासी, व्यावसायिक, औद्योगिक आदी नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून कर वसुलीसाठी महापालिकेचे विविध झोन तयार केले आहेत, तसेच ऑनलाईन आणि विविध ॲपच्या माध्यमातून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात आत्तापर्यंत ३३३ कोटी मालमत्ता कर जमा झाला आहे. नागरिकांना मालमत्ता कर ऑनलाईन पद्धतीने भरता यावा यासाठी महानगरपालिकेने सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड तयार केले आहे.

महानगरपालिकने मालमत्ता कर ऑनलाईन भरण्यासाठी PMC TAX APP विकसित केले आहे. तसेच www.panvelmc.org या वेबसाईटवर जाऊनही आपला मालमत्ता कर नागरिकांना भरता येणार आहे. मालमत्ताधारकांना काही शंका असल्यास (१८००-५३२०-३४०) या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# तोतया पोलिसाची हॉटेलमध्ये दमदाटी

## पनवेल शहर पोलिसांनी केली अटक

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस अधिकाऱ्याचा गणवेश परिधान करून हॉटेलमध्ये जावून दमदाटी करणाऱ्या तोतया व्यक्तीस पनवेल शहर पोलिसांनी अटक केली आहे.

आरोपी सलमान तजमुद्दीन मुलाणी (वय ३१) याने पोलीस उपनिरीक्षकचा युनिफॉर्म घालून स्वतः पोलीस अधिकारी आहे, असे भासवून सिताज हॉटेल कोळखे येथे गेला व मॅनेजरला, ‘माझ्या मैत्रीणीला शिवीगाळ करून तिला कामावरून का काढून टाकले, तिला लगेच कामावर घे नाहीतर तुझे हॉटेल बंद करेन’, अशी धमकी देऊन मारहाण केली.



मॅनेजरने पनवेल शहर पोलीस ठाण्यात पुण्यावरून पोलीस अधिकाऱ्याचा ड्रेस घालून आलेल्या पोलीस अधिकाऱ्याने त्यांना धमकावून मारहाण केल्याबाबत माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पनवेल शहर पोलिसांनी हॉटेल सिताज येथे जाऊन सलमान तजमुद्दीन मुलाणी याचेकडे कौशल्यपूर्वक विचारपूस केली असता, तो पोलीस अधिकारी नसल्याचे निष्पन्न झाले. हॉटेल मॅनेजर यांची तक्रार घेऊन आरोपीविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे व पोलीस सहआयुक्त संजय येनपुरे यांनी दिलेल्यासूचनांनुसार व पोलीस उपआयुक्त विवेक पानसरे, परिमंडळ ०२, पनवेल व सहा. पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोनि. (गुन्हे) बागवान, पोउपनि. अभयसिंह शिंदे, अस्पतवार व डि. बी. पथकाचे अमलदार यांनी केली आहे.

# फेसबुकवरील जाहिरातीला भुलून ४६ लाख ६० हजार गमावले

**पनवेल : वार्ताहर**

फेसबुकवरील शेअर मार्केटच्या जाहिरातीला भुलून एका व्यक्तीने ४६ लाख ६० हजार रुपये गमावल्याची घटना समोर आली आहे. पनवेल येथे राहणाऱ्या ५१ वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेलमधील या व्यक्तीला फेसबुकवर शेअर मार्केटसंदर्भातील जाहिरात दिसली होती. या जाहिरातीला त्यांनी प्रतिसाद दिला असता त्यांना ग्रुपमध्ये घेण्यात आले होते. त्याठिकाणी त्यांना नफ्याचे आमिष दाखवून आर्थिक गुंतवणूक करण्यास भाग पाडले. त्यांच्यावर विश्वास ठेवून फिर्यादींनी तब्बल ४६ लाख ६० हजार रुपये पाठवले होते, मात्र कालांतराने कोणताही नफा त्यांना मिळाला नाही. याबाबत विचारणा केली असता, समोरून उत्तरही आले नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली असता गुन्हा दाखल केला आहे.



**पनवेल** : भाजप महिला मोर्चा शहराध्यक्ष राजश्री महेंद्र वावेकर यांनी प्रभाग क्र. १८च्या महिला मोर्चाच्या उपाध्यक्षपदी स्वाती पवार यांची नियुक्ती केली आहे. याबद्दल पनवेल विधानसभा निवडणूक प्रमुख तथा जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले. या वेळी प्रभाग अध्यक्ष संजीवनी खिल्लारे, सोशल मीडिया शहर संयोजक प्रसाद हनुमंते, शहर चिटणीस रूपेश नागवेकर, प्रभाग अध्यक्ष महेश सरदेसाई, विजय डिसोझा, प्रसाद कंधारे, रवी संदेपाल आदी उपस्थित होते.

## पनवेल महापालिकेत तीन उपायुक्तांच्या नियुक्त्या

**पनवेल : वार्ताहर**

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख आणि उपायुक्त असलेले सचिन पवार आणि गणेश शेटे यांच्या बदल्या झाल्या होत्या. यानंतर रिक्त झालेल्या जागांसाठी तीन उपायुक्तांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

यामध्ये संतोष वारुळे, मारुती गायकवाड आणि बाळासाहेब राजळे या उपायुक्ताचा समावेश आहे. अचानक रिक्त झालेल्या जागांवर नियुक्त्या करण्यास शासनाने तत्परता दाखविली नसल्याने ऐन पावसाळ्याच्या तोंडावर पावसाळी कामे तसेच मार्च अखेरसारखी मालमत्ता वसुलीच्या कामांवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अद्यापही पालिकेची ११ सहाय्यक आयुक्त पदे रिक्त आहेत. आयुक्त पदासाठी जोरदार रस्सीखेच सुरू असल्याने आयुक्तांची नियुक्ती लांबणीवर पडल्याचे बोलले जात आहे.

# सीकेटी महाविद्यालयात रोजगार आणि व्यवसायविषयक कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (स्वायत्त) येथे प्लेसमेंट सेल व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि युवा उत्थान फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.२७) एमएसएमईच्या रोजगार आणि व्यवसायाविषयीच्या विविध योजना या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास युवा उत्थान फाउंडेशनचे प्रकल्प समन्वयक सुशांत शेलार, तसेच सीजीटीएमएसईचे शाजी के. व पंकज आचरेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, विज्ञान शाखा प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर व कला शाखा प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमात युवा उत्थान फाउंडेशनचे प्रकल्प समन्वयक सुशांत शेलार यांनी युवा उत्थान प्रतिष्ठानबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, तसेच सीजीटीएमएसईच शाजी के. व पंकज आचरेकर यांनी कार्यक्रमात एमएसएमईच्या रोजगार आणि व्यवसायविषयीच्या विविध योजनांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कला, वाणिज्य आणि सायन्स विभागातील ९५ पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमासाठी प्लेसमेन्ट सेलचे चेअरमन सत्यजित कांबळे, ट्रेनिग आणि प्लेसमेन्ट ऑफिसर आरती कागवाडे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आकाश पाटील आणि आभार प्रदर्शन प्लेसमेन्ट सेलचे चेअरमन प्रा. सत्यजित कांबळे यांनी केले.

कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे व प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## संकष्ट चतुर्थीनिमित्त भाविक महागणपती चरणी नतमस्तक

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

तालुक्यातील चिरनेर येथे गुरुवारी (दि.२८) संकष्ट चतुर्थीनिमित्त शेकडो भाविकांनी चिरनेर महागणपतीचे दर्शन घेतले. सकाळपासूनच महागणपतीच्या दर्शनाला भाविकांची सुरुवात केली होती.

उरण, पनवेल, नवी मुंबई, ठाणे, मुंबईसह विविध ठिकाणचे भक्तगण चिरनेरमुक्कामी श्रींचे मनोभावे दर्शन घेण्यासाठी नित्यनेमाने दाखल होते. नवसाला पावणारा आणि भक्तांच्या हाकेला धावणारे दैवत म्हणून चिरनेर महागणपतीची अनुभूती असल्याने प्रचिती येणारे भाविक आपल्या मनोकामना पूर्णतः वास नेण्यासाठी या चिरनेरच्या महागणपतीला नतमस्तक होण्यासाठी संकष्ट चतुर्थीनिमित्त चिरनेर महागणपतीच्या दर्शनासाठी दाखल झाले होते.

उरणसह इतर तालुक्यातील भक्तगणांच्या पायी दिंड्या दाखल झाल्या होत्या. चिरनेर परिसरातील तसेच अन्य ठिकाणाहून आलेल्या खेळणी, महिलांचे सौंदर्य प्रसाधने साहित्य, तसेच गाव परिसरातील भाज्या, कडधान्य व्यावसायिकांच्या व्यवसायाला उभारी मिळत आहे.



## उरणमध्ये छत्रपती शिवरायांना अभिवादन



**उरण : वार्ताहर**

तालुक्यातील चिरनेर रांजणपाडा, चिंचपाडा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रांजणपाडा, चिंचपाडा ग्रामस्थांच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. यानिमित्ताने शिवछत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याचा अभिषेक, विधिवत पूजन करून छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देण्यात आली.

उपस्थित ग्रामस्थांनी शिवपुतळ्याला पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन केले. दरम्यान जय भवानी, जय शिवाजीच्या जयघोषाने परिसरातील वातावरण शिवमय झाले होते. या वेळी भगवा झेंडादेखील फडकविण्यात आला. कीर्तनकार हभप प्रकाश पाटील महाराज यांचे कीर्तन झाले. शिवजन्मोत्सवाच्या निमित्ताने पाळणा गीत सादर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा पालखीत ठेवून चिरनेर गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. शिवाजी महाराजांच्या पालखीचे गावातील अनेक माता भगिनींनी आरती ओवाळून औक्षण केले. शिवजन्मोत्सवाचे औचित्य साधून सत्यनारायणाच्या महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. शिवभक्तांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.





## शिवजयंती उत्साहात

**पनवेल : सिद्धेश्वर प्रकल्पग्रस्त संस्थेच्या वतीने तळोजा मजकूर येथे तिथीनुसार शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी तेथे जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. त्यांच्यासमवेत माजी नगरसेवक हरेश केणी, माजी सरपंच संतोष पाटील, हरिदास पाटील, मुरली पाटील, नितीन पाटील, बूथ अध्यक्ष दीपक पाटील आदी उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पालखी सोहळ्यातही सहभाग घेतला.**

## संपादकीय

# महासत्तांचा मुखभंग

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या प्रकरणाच्या न्यायालयीन सुनावणीसंदर्भात आधी जर्मनी आणि नंतर अमेरिकेने काही नाक खुपसणारी विधाने केली, परंतु आताचा भारत गप्प बसणारा नाही याचाही वस्तुपाठ या देशांना ताबडतोब मिळाला आहे.

**जग हे छोटेसे खेडे आहे ही कल्पना साधारणपणे नव्वदीच्या दशकात रुजू लागली. आपल्या भारतीय संस्कृतीत तर वसुधेला म्हणजेच पृथ्वीला एक कुटुंब मानण्याची परंपरा आहे. ज्ञानेश्वर माऊलीने 'हे विश्वचि माझे घर' असे म्हटले होते, तथापि संपूर्ण जगाला एक कुटुंब किंवा एक गाव मानण्याची कल्पना कितीही चांगली असली तरी वास्तवात मात्र जग असंख्य सरहद्दींनी विखुरलेले आहे. या विखुरलेल्या जगात प्रत्येक देश आपापल्या सरहद्दीत आपल्या संस्कृतीला आणि समाजाला जपत असतो. यातूनच पुढे राष्ट्रीय अस्मितेची भावना जागृत झाली. राष्ट्रवादाच्या संकल्पनेनुसार प्रत्येक देश हा सार्वभौम असतो आणि अन्य देशांनी त्याचे सार्वभौमत्व आणि स्वातंत्र्य यांचा सन्मान करायला हवा. नेमके तिथेच अमेरिकेचे घोडे पेंड खाते. दुसऱ्या महायुद्धानंतर महासत्ता होऊन बसलेल्या अमेरिकेला ज्यात-त्यात नाक खुपसायची जुनी खोड आहे. संपूर्ण जगातील शांततेची आणि व्यापाराची मक्तेदारी आपल्याकडेच असल्याची श्रेष्ठत्वाची भावना अमेरिकेच्या सत्ताधीशांनी पिढ्यान् पिढ्या जोपासली. अर्थात, छोट्या-मोठ्या देशांवर दादागिरी करण्याची अमेरिकेची खोड अनेकदा मोडलीही गेली आहे. छोट्याशा व्हिएतनामने या महासत्तेचे अक्षरश: कंबरडे मोडले होते. दुर्दैवाने बरेचसे विकसनशील देश अमेरिकी साह्याच्या कुबड्यांवरच तग धरून राहात असल्याने त्यांना अमेरिकेची दादागिरी सहन करण्यावाचून पर्याय नसतो. अमेरिकेने डोळे वटारले की अशा देशांचे सत्ताधीश लीनदीन होऊन जाताना दिसतात. भारतीय स्वातंत्र्यासोबतच निर्माण झालेला शेजारचा पाकिस्तान अमेरिकेचे मिंधेपण दशकानुदशके अभिमानाने मिरवत आहे. भारताने मात्र अमेरिकेची दादागिरी कधीच फारशी खपवून घेतली नाही हे खरे. स्व. पंतप्रधान इंदिरा गांधी आणि नव्वदीच्या दशकात देशाचे नेतृत्व सांभाळणारे स्व. पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कारकीर्दींमध्ये पोखरण येथे दोनदा अणुचाचण्या यशस्वीरित्या पार पडल्या. या चाचण्यांनंतर अमेरिकेने भुवया उंचावल्या. तरीही त्याला भारताने भीक घातली नाही. अमेरिकेने लादलेल्या अत्यंत कडक आंतरराष्ट्रीय निर्बंधांनादेखील भारतीय नेतृत्व घाबरले नाही. तरीही भारत आणि अमेरिकेचे संबंध टोकाचे बिघडलेही नाहीत आणि मिंधेपणाच्या पातळीलाही कधी गेले नाहीत. जित्याची खोड तशी जात नसते हे खरेच. त्याचे प्रत्यंतर दोन दिवसांपूर्वी आले. दिल्लीतील बहुचर्चित मद्य घोटाळ्यासंदर्भात मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सक्तवसुली संचालनालयाने अटक केल्यानंतर अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याला अचानक त्यांचा पुळका आला. भारतातील न्यायालयीन चौकशी न्याय्य आणि पारदर्शक पद्धतीने व्हायला हवी अशी टिप्पणी अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याच्या अधिकाऱ्याने केली. याच्याही पुढे जाऊन केजरीवाल यांची अटक आणि काँग्रेस पक्षाची गोठवलेली बँक खाती यावर आम्ही लक्ष ठेवून आहोत, असेही अमेरिकेने म्हटले. आता याला भोचकपणा म्हणायचे नाही तर काय म्हणायचे? भारत हा एक सार्वभौम देश आहे. या देशातील न्यायव्यवस्था आणि अंतर्गत निवडणुकांची दखल घेण्याची उठाठेव अमेरिकेने करण्याचे कारण काय हाच खरा सवाल आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र अधिकाऱ्यांना पाचारण करून भारतीय परराष्ट्र खात्याने त्यांचे चांगलेच कान उपटले हे योग्यच झाले. नवा भारत असली मुक्ताफळे ऐकून घेणारा नाही हे यानिमित्ताने जगाला कळले.**

# ...म्हणून साजरा केला जातो 'गुड फ्रायडे'



गुड फ्रायडे हा ख्रिश्चन धर्माचा एक प्रमुख दिवस आहे. आज २९ मार्च २०१४ रोजी 'गुड फ्रायडे'हा दिवस पाळला जाणार आहे. याचे नाव गुड फ्रायडे असले तरी ख्रिस्ती बांधव हा 'शोक दिवस' म्हणून पाळतात. गुड फ्रायडेची तारीख 'ईस्टर संडे'च्या तारखेनुसार निश्चित होते. दरवर्षी 'ईस्टर संडे'च्या तीन दिवस आधी म्हणजे शुक्रवारी 'गुड फ्रायडे' पाळला जातो, पण हा दिवस का पाळला जातो आणि त्यामागची नेमकी कथा काय आहे जाणून घेऊ..

इतिहास : जेरुसलेम प्रांतात भगवान येशू ख्रिस्त हे ख्रिश्चन धर्माचा प्रसार, प्रचार करीत होते. ख्रिस्तांच्या बोलण्याकडे अनेक लोक आकर्षित व्हायचे. येशू स्वत:ला देवाचा पुत्र मानत होते, जे तत्कालीन धर्मप्रसारकांना आवडत नव्हते. या वेळी येशूंनी आपली बाजू लोकांना पटवून सांगितली, जी काही लोकांना पटली देखील. त्यामुळे येशूंच्या किमयेने लोक त्या धर्मप्रसारकांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करू लागले. धर्मप्रसारकांनी या गोष्टीची तक्रार रोमन गव्हर्नर पिलाता यांच्याकडे केली. तसेच येशूमुळे धर्म आणि राष्ट्रासाठी धोका असल्याचा दावा केला. या वेळी रोमन गव्हर्नर पिलाता याने प्रभू येशू ख्रिस्ताला गोलागोथानामक वधस्तंभावर लटकवले आणि त्यांच्या हाता-पायांना खिळे ठोकून त्यांना शिक्षा दिली. या शिक्षेत रोमन सैनिकांनी त्यांना खूप यातना दिल्या, असेही बायबलमध्ये सांगितले आहे. याच वेळी येशू ख्रिस्त यांचा मृत्यू झाला. ज्या दिवशी प्रभू येशू ख्रिस्तांना वधस्तंभावर लटकवण्यात आले तो दिवस शुक्रवारचा होता. त्यामुळे येशू ख्रिस्तांच्या स्मरणार्थ हा दिवस 'गुड फ्रायडे' म्हणून पाळतात. ख्रिश्चन धर्माचे अनुयायी हा दिवस 'शोक दिवस' म्हणून पाळतात. चर्चमध्ये जाऊन प्रभू येशूचे स्मरण केले जाते आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याची प्रतिज्ञा घेतली जाते. 'गुड फ्रायडे'ला होली फ्रायडे, ब्लॅक फ्रायडे किंवा ग्रेट फ्रायडे म्हणूनही ओळखले जाते. या दिवशी काही ख्रिश्चनबांधव उपवास ठेवतात, या काळात मांस खाल्ले जात नाही, परंतु फळे, भाज्या, मासे, दूध आणि गहू यांचे सेवन नक्कीच केले जाते.

'गुड फ्रायडे' का म्हणतात? : अनेक जण असेही म्हणतात की, या दिवसाला मूलतः 'गॉड' फ्राइज म्हटले जात होते, जो कालांतराने 'गुड फ्रायडे' बनला. काहींचा असा विश्वास आहे की, या दिवसाचे नाव योग्य आहे, कारण येशूचे दुःख त्याच्या अनुयायांना पापापासून वाचवण्याची देवाची योजना होती.

'गुड फ्रायडे' नंतर ईस्टरचा सण येतो. चर्चच्या लूनर कॅलेंडरनुसार, ईस्टर हा पाश्चाल पौर्णिमेनंतरच्या पहिल्या रविवारी पाळला जातो. जो या वर्षी ३१ मार्च रोजी आहे, म्हणजे २९ मार्च रोजी 'गुड फ्रायडे' आणि ३१ मार्च रोजी ईस्टर पाळला जाईल.

### या दिवशी मासे खाण्याला का आहे एवढे महत्त्व?

ख्रिश्चन धर्माचे लोक या दिवशी मांस खात नाहीत, पण त्याऐवजी मासे खातात. या मागचे कारण असे की, समुद्रातून मिळणारे मासे हे मांसापेक्षा (चिकन, मटण) वेगळे मानले जातात. माशांचा आकार हे ख्रिश्चन धर्मातील एक गुप्त प्रतीक मानले जाते. कारण ज्या वेळी ख्रिश्चन धर्मावर बंदी घालण्यात आली त्या वेळी ख्रिश्चन बांधवांनी एकमेकांना माशांच्या मदतीने ओळखले. यात येशू ख्रिस्तांवर विश्वास ठेवणाऱ्यांमध्येही अनेक मच्छीमार होते.

याशिवाय पूर्वीच्या काळी मांस हा खास पदार्थ मानला जात होता. त्याचदरम्यान मासे सहज उपलब्ध व्हायचे, जे बहुतेक लोक सहज खरेदीदेखील करू शकत होते. या दिवशी मासे खाण्याचे आणखी एक कारण म्हणजे मासे खाण्यास थंड असतात, पण मांस (मटण, चिकन) उष्ण असते, जे उपवास करणाऱ्या व्यक्तीसाठी चांगले मानले जात नाही. त्यामुळे 'गुड फ्रायडे'च्या दिवशी अनेक ख्रिश्चन बांधव मांसापेक्षा मासे खाणे पसंत करतात. (साभार : इंटरनेट)

# ज्येष्ठ साहित्यिक-समीक्षक डॉ. नागनाथ कोतापल्ले

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक अशी डॉ. नागनाथ लालूजीराव कोतापल्ले यांची ओळख राहिली आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २९ मार्च १९४८ रोजी मुखेड (जि. नांदेड) येथे त्यांचा जन्म झाला होता.

नागनाथ कोतापल्ले यांचे महाविद्यालयीन शिक्षण देगलूर येथे झाले. बीए आणि एमए या दोन्ही परीक्षांत मराठवाडा विद्यापीठात ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. ते कुलपतींच्या सुवर्णपदकाने सन्मानित झाले होते. 'शंकर पाटील यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध लिहून त्यांनी १९८० साली पीएचडी पदवी संपादन केली. बीड येथील महाविद्यालयात १९७१ ते १९७७ या काळात मराठीचे अधिव्याख्याता म्हणून काम केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये त्यांनी अधिव्याख्याता आणि प्रपाठक या पदांवर १९७७ ते १९९६ या काळात काम केले.



यानंतर नागनाथ कोतापल्ले हे पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५पासून २०१०पर्यंत कोतापल्ले मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते. व्यासंगी, अध्यापनकुशल, उपक्रमशील आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी लौकिक मिळवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक आणि पुणे विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे समन्वयक या पदांवरून त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.

नागनाथ कोतापल्ले यांनी राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बालपुरस्कार समिती आणि एसएससी बोर्डाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणूनदेखील काम केले आहे. कोतापल्ले हे १९८८ ते ९५ या काळात मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह, १९९५ ते ९६मध्ये साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष आणि साहित्य संस्कृती मंडळाच्या मराठी वाङ्मयकोशाचे समन्वय संपादक होते. 'प्रतिष्ठान' या नियतकालिकाचे संपादक म्हणूनही त्यांनी काम केले आहे, तर राजभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या समितीचे ते अध्यक्ष होते.

श्रीगोंदा येथे १९९९ साली झालेल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आणि २००५ साली जालना येथे झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे कोतापल्ले अध्यक्ष होते. चिपळूण येथे २०१२ मध्ये झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते.

### साहित्यसंपदा


◆ मूड्स (कवितासंग्रह) ◆ कर्फ्यू आणि इतर कथा, रक्त आणि पाऊस, संदर्भ, कवीची गोष्ट, सावित्रीचा निर्णय, देवाचे डोळे (कथासंग्रह) ◆ राजधानी (दीर्घकथा संग्रह) ◆ मध्यरात्र, गांधारीचे डोळे, प्रभाव (कादंबरी) ◆ पापुद्रे, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध, नवकथाकार शंकर पाटील, साहित्याचा अन्वयार्थ, मराठी कविता : एक दृष्टिक्षेप, साहित्याचा अवकाश (समीक्षात्मक) ◆ गावात फुले चांदणे (प्रौढ नवसाक्षरांसाठी लघुकादंबरी) ◆ मराठी साहित्य संमेलने आणि सांस्कृतिक संघर्ष, उद्याच्या सुंदर दिवसासाठी (ललित गद्य), ◆ जोतीपर्व (अनुवादित पुस्तक) ◆ स्त्री-पुरुष तुलना, शेतकऱ्यांचा आसूड, पाचोळा आणि दहा समीक्षक, निवडक बी रघुनाथ (संपादन).



## बदलते तंत्रज्ञान

# ॲन्ड्रॉईड वापरकर्त्यांनो, मोबाईलवर 'हे' बदल करा!

सरकारी एजन्सी CERT-Inने ॲन्ड्रॉईड वापरकर्त्यांसाठी एक इशारा जारी केला आहे. नवीन ॲन्ड्रॉईडमध्ये अनेक त्रुटी होत्या, ज्याचा फायदा घेऊन हॅकर्स डिव्हाइसला लक्ष्य करू शकतात. ॲन्ड्रॉईडवापरकर्त्यांसाठी सरकारी एजन्सीने इशारा दिला आहे. इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीम म्हणजेच CERT-Inने ॲन्ड्रॉईड वापरकर्त्यांसाठी एक नवीन इशारा दिला आहे. अँड्रॉइडच्या नवीन अपडेटमध्ये अशा अनेक त्रुटी आढळल्या आहेत, याचा फायदा हॅकर्स घेऊ शकतात. सायबर सिक्युरिटी एजन्सीने युजर्सना याबाबत माहिती देण्यासाठी एक अहवालही जारी केला आहे.




अहवालानुसार Google आणि Qualcomm आणि MediaTekसारख्या स्मार्टफोन बनवणाऱ्या कंपन्यांनी या सुरक्षेसाठी नवीन अपडेट केले आहे. सॅमसंग फोनमध्ये दोष आढळले आहेत. सॅमसंगनेही एक्सपोजर संबंधी पॅचदेखील जारी केले आहेत. एजन्सीने या त्रुटींबद्दल सॅमसंगला खाजगीरित्या माहिती दिली होती. लेटेस्ट माहितीनुसार CERT-Inने अँड्रॉइड फोनमध्ये आढळलेल्या अनेक असुरक्षा हायलाइट केल्या आहेत.

यामध्ये फ्रेमवर्क, सिस्टम, एएमएलॉजिक, आर्म घटक, मीडियाटेक घटक, क्वालकॉम आणि क्वालकॉम बंद स्त्रोत घटकांचा समावेश आहे. CERT-Inने या समस्यांबाबत उच्चस्तरीय इशारा जारी केला आहे. या त्रुटींचा परिणाम ॲन्ड्रॉईड १२, १३ आणि Android १४वर काम करणाऱ्या उपकरणांवर होत आहे. सायबर सिक्युरिटी एजन्सीच्या म्हणण्यानुसार गुगलने अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टममध्ये असलेल्या त्रुटींसाठी एक पॅच जारी केला आहे. या असुरक्षिततेचा फायदा घेऊन हॅकर्स तुमची खाजगी माहिती चोरू शकतात. गुगलने लेटेस्ट अँड्रॉइड सिक्युरिटी बुलेटिनमध्ये या पॅचची माहिती दिली आहे.

सॅमसंगने दिलेल्या माहितीनुसार ज्या उपकरणांमध्ये नवीन सुरक्षा अद्यतन आहे, जे १ मार्च रोजी रिलीज झाले होते, त्यांना धोका नाही. जर तुम्ही तुमच्या फोनवर लेटेस्ट सिक्युरिटी अपडेट इन्स्टॉल केले नसेल, तर या त्रुटींमुळे तुम्ही हॅकर्सचे शिकार होऊ शकता. ताबडतोब तुमच्या फोनवर नवीन अपडेट करा. फोनच्या सेटिंग्जमध्ये जाऊन तुम्ही नवीनतम सॉफ्टवेअर अपडेट इन्स्टॉल करू शकता. यासाठी तुम्हाला सर्वप्रथम सेटिंगमध्ये जावे लागेल. येथे तुम्हाला सॉफ्टवेअर अपडेटचा पर्याय मिळेल. यावर क्लिक करून तुम्ही नवीनतम सुरक्षा अपडेट इन्स्टॉल करू शकता.

# विनोदी कथा लेखनकार बाळ गाडगीळ

जवळपास पन्नास वर्षे प्राधान्याने विनोदी कथालेखन करणारे बाळ गाडगीळ यांचा आज जन्मदिन आहे. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील हुर्से या गावी झाला. कौटुंबिक आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने स्वत:च्या पायावर उभे राहत पुढील सर्व उच्च शिक्षण घेतले. मुंबई विद्यापीठात अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी घेऊन भारतीय प्रशासनिक सेवा (आय.ए.एस) आणि मध्यवर्ती सेवा परीक्षा उत्तीर्ण (१९५१) झाले. अमेरिकेतील विस्कोन्सिन विद्यापीठात (१९६३) शिक्षण व नोकरी केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून मुंबई, पुणे, सांगली येथे काम केले. सांगलीच्या बृहन्महाराष्ट्र कॉमर्स व पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून दीर्घकाळ काम करीत असताना प्रशासनाचाही मोठा अनुभव मिळाला. शिक्षण क्षेत्रातील वेगळा प्रयोग म्हणून ओळखल्या जाणार्या 'सिम्बॉयसीस' या शिक्षणसंस्थेचे प्रथम शिक्षण सल्लागार, विद्यमान उपाध्यक्षपदी कार्यरत होते.

गाडगीळांचा अध्ययन व अध्यापन याचा विषय अर्थशास्त्र हा असल्याने या विषयावर त्यांनी क्रमिक पुस्तके लिहिली असून अर्थशास्त्र विषयक राष्ट्रीय व जागतिक नियतकालिकांमधूनही विपुल लेखन केले . अर्थशास्त्र विषयक अनेक परिषदांमध्येही ते सहभागी झाले . उत्तम वक्ते, कथाकार,



### निमित्त

कादंबरीकार, प्रवासवर्णनकार म्हणून प्रसिद्ध असलेल्या गाडगीळांनी 'वळचणीचे पाणी' (२००१) हे आत्मचरित्र लिहिले असून त्यात कोकणातील दारिद्र्य आणि त्यावर मात करून स्वत:चे स्वतंत्र विश्व निर्माण करणार्या पांढरपेशा वर्गाचे दर्शन घडते. अनेक अनुकूल-प्रतिकूल वाटा, वळणांचा शोध घेत हे वळचणीचे पाणी कसे प्रवाहित राहिले, त्याचा प्रवाही वेध गाडगीळ यांच्या या आत्मचरित्रातून घेतलेला जाणवतो. बर्या-वाईट अनुभवांबरोबरच यातून काही व्यक्तिचित्रे (विशेषतः त्यांच्या आईचे) चांगल्या रितीने साकारली.

गाडगीळ यांनी मराठी साहित्यसृष्टीत विनोदी कथाकार म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या या कथा बहुतांश मध्यमवर्गीय मानसिकतेवर बेतल्या असल्या आणि चिं. वि. जोशी यांचा प्रभाव त्या कथांवर जाणवत असला; तरी वेगळी शैली, अनुभवांचे वैविध्य, रोचक भाषा यांमुळे त्या स्वतंत्र अंगाच्या, वेगळ्या ढंगाच्या झाल्या . समाजातील व्यथा, वेदना, विसंगती, कारुण्य, स्वार्थ अशा अनेक गोष्टींना गाडगीळांच्या कथालेखनातून नेमकेपणाने स्थान मिळाले.

'विनोद केवळ हसण्यावारी नेण्याची गोष्ट नाही. त्यामागे एक जीवनदृष्टी आहे', अशी भूमिका घेऊन त्यांनी सर्व अंगांनी विनोद विवेचन केले असून इतर विनोदी साहित्याबद्दल गाडगीळांचा दृष्टिकोन स्वागतशील म्हणावा लागेल. गाडगीळांच्या बहुतेक पुस्तकांना त्या-त्या वेळच्या मान्यवर समीक्षकांच्या आस्वादक प्रस्तावना आहेत. त्यांत वा. ल. कुलकर्णी, म. द. हातकणंगलेकर यांचा समावेश आहे.

'सिगारेट आणि वसंतऋतु' या वेगळ्या प्रकारच्या प्रवासवर्णनातून अमेरिकेचे खेळकर, प्रसन्न आणि तरीही चिंतनशील दर्शन घडते. 'दुपारच्या सावल्या'मधून त्यांनी लिहिलेली वेचक व वेधक व्यक्तिचित्रे समोर येतात. 'आदर्श शिक्षक' पुरस्कारासह अनेक पुरस्कार त्यांना मिळाले असून साहित्य संमेलनांची अध्यक्षपदे त्यांनी भूषविली आहेत. प्रा. हातकणंगलेकर यांनी 'प्रसन्न शैली आणि हृद्य, खुबीदार, निर्विष विनोदबुद्धी' अशा शब्दांत गाडगीळांबद्दल लिहिले आहे.

**-मधू नेने**

### क्लिक...क्लिक...!




**गोवा : पनवेलमधील चित्रकार केविन डायस विविध स्पर्धांनिमित्त वेगवेगळ्या ठिकाणांना भेट देऊन जागेवर असे निसर्ग चित्र रेखाटतो.**

## आरोग्य प्रहर

# जाणून घ्या, बीपी नॉर्मल ठेवणारे 'हे' चार पदार्थ

जगात सर्वाधिक मृत्यू हृदयविकारामुळे होतात. त्याचे मुख्य कारण म्हणजे बीपीचा आजार होय, ज्याला उच्च रक्तदाब असेही म्हणतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, ३० ते ७९ वयोगटातील सुमारे १.२८ अब्ज लोक या आजाराचे बळी आहेत. पण तुम्हाला माहित आहे का की उच्च रक्तदाब तुमच्या मेंदूसाठीही धोकादायक आहे. मेंदूतील रक्तदाब वाढल्याची लक्षणे काय आहेत? तर उच्च रक्तदाबामुळे मेंदूच्या नसांना इजा होऊ शकते. ज्यामुळे स्ट्रोक होतो.



ही एक जीवघेणी स्थिती आहे ज्यामध्ये रक्तवाहिनी फुटल्यामुळे रुग्णाचा गोंधळ उडतो, बघायला आणि बोलण्यात अडचण येते, शरीर आणि चेहऱ्याच्या एका बाजूला बधीरपणा येतो, चालायला त्रास होतो आणि तीव्र डोकेदुखी होते. हे होऊ द्यायचे नाही म्हणून बाबा रामदेव यांनी चार पदार्थांबद्दल सांगितले जे बीपी नॉर्मल करतात.

खजूर : रक्तदाब सामान्य करण्यासाठी खजूर खावे. सोडियम कमी आणि पोटॅशियम जास्त असल्याने त्यांचा आहारात समावेश केल्यास उच्च रक्तदाबापासून आराम मिळतो. हे गोड फळ कॅल्शियम, लोह, फॉस्फरस आणि मँगनीजचे स्त्रोत देखील आहे.

दालचिनी : दालचिनी सेवन केल्याने सिस्टोलिक आणि डायस्टोलिक रक्तदाब सामान्य होतो. हृदयरोगींसाठी ही औषधी वनस्पती खूप फायदेशीर ठरू शकते. यामुळे तुमच्या मज्ञातंतूंना आराम मिळतो आणि ब्लॉकेजचा धोका झपाट्याने कमी होतो.

मनुके : मनुका मध्ये पोटॅशियम असते ज्यामुळे रक्ताच्या धमन्या निरोगी होतात. अँटिऑक्सिडंट्सच्या मदतीने हे ड्राय फ्रूट उच्च रक्तदाब नियंत्रित करू शकते. यामुळे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि पक्षाघाताचा धोका कमी होतो.

गाजर : गाजर हे एक प्लांट बेस्ड फूड आहे. विविध संशोधनांमध्ये दिसून आले आहे की हे खाल्ल्यानंतर बीपी पातळी सामान्य झाली आहे. यामागे फायबर आणि पोटॅशियमची महत्त्वाची भूमिका दिसून आली आहे. गाजराचा ज्यूस पिऊनही तुम्हाला हा फायदा मिळू शकतो.

**(हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी असून यामधून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा केला गेलेला नाही. अधिक जास्त माहितीसाठी नेहमी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य ते बदल करा.)**

# मशालींच्या तेजाने दौलतगड उजळला

## ३५०व्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने ३५० मशाली प्रज्वलित

**महाड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवरायांच्या इतिहासाचे साक्षीदार असलेले अनेक गड किल्ले आजही अपरिचित आहे. महाडजवळील दासगाव गावातील दौलतगडावर काही वर्षांपासून मशाल महोत्सव राबवून हा गड प्रकाशात आणला जात आहे. शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला गडावर शेकडो मशाली प्रज्वलित केल्या गेल्या आणि या मशालींच्या तेजाने दौलतगड पुन्हा एकदा प्रकाशमान झाला.



महाड तालुक्यामध्ये किल्ले रायगडच्या परिसरात अनेक टेहळणी बुरुज आहेत. त्यापैकी दासगाव गावामध्ये दौलतगड नावाचा टेहळणी गड आहे. गडावर सध्या तरी कोणतीच इमारत अगर वास्तू नसून फक्त पायांचे अवशेष अस्तित्वात असल्याचे दिसून येते, मात्र गडाचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहचावा याकरिता स्थानिक तरुणांच्या माध्यमातून गडावर मशाल महोत्सव साजरा करण्यात आला. शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला किल्ले दौलत गडावर मशाली प्रज्वलित करून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शिवजन्मोत्सव तसेच शिवराज्याभिषेकाला ३५० वर्षे झाली त्यानिमित्ताने बुधवारी (दि.२७) छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला ३५० मशाली प्रज्वलित केल्या गेल्या. या वेळी गडावर सांस्कृतिक कार्यक्रम, पारंपरिक गोंधळ, आणि मशाल प्रज्वलन आदी कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यामुळे गेली अनेक वर्षे सुनसान असलेला दौलतगड बोलका झाला. दासगावसह परिसरातील गावातील तरुण, ग्रामस्थ, महिला पारंपरिक वेशभूषेत गडावर दाखल झाले होते. विविध वाद्यांच्या आवाजाने गडावर चैतन्य निर्माण झाले होते.

या मशाल महोत्सवामुळे दौलतगड ३५० मशालींनी पुन्हा एकदा प्रकाशमान झाला. ३५०व्या शिवराज्याभिषेकाच्या निमित्ताने दौलत गडावर ३५० मशाली प्रज्वलित करून विविध कार्यक्रमांतून दौलतगड प्रकाशमान झाल्याचे पांडुरंग निवाते, निलेश निवाते, राहुल उकिर्डे, निलेश कर्जावकर यांनी सांगितले.

## वाहतूक पोलिसांची चालकांवर धडक कारवाई


**रायगड : रामप्रहर वृत्त**

वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या चालकांवर वाहतूक पोलिसांनी कावाईचा बडगा उगारला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत येणाऱ्या वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि. २७) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण ३३७ चालकांवर कायदेशीर कारवाई केली.

यामध्ये विनापरवाना वाहन चालविणे, विनाहेल्मेट दुचाकी चालविणे, सिटबेल्ट न लावणे, वाहनाची कागदपत्रे अद्यावत नसणे, लेनची शिस्त मोडणे अशा प्रकारचे नियमभंग केलेल्या ३३७ चालकांवर कारवाई करून वाहतूक पोलिसांनी त्यांच्याकडून एकूण दोन लाख ७९ हजार ८००रुपये इतका दंड आकारला आहे. त्यामुळे चालकांचे धाबे दणाणले आहेत.

# 'कर्जत एकात्मिक बालविकास'चा भार प्रभारींवर

## पर्यवेक्षिकांची अनेक पदे रिक्त



**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील आदिवासी आणि दुर्गम भागात शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना पोषण आहार देण्यासाठी अंगणवाडी केंद्रे चालविली जातात. या सर्व केंद्रांचे नियोजन करण्यासाठी एकात्मिक बालविकास विभाग काम करीत आहे. तालुक्यात ३३० अंगणवाडी केंद्र असून त्या केंद्रांचे संचलन करण्यासाठी कर्जत १ आणि कर्जत २ विभाग राजिपने बनविले आहेत. त्या दोन्ही प्रकल्पांमध्ये प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे अनेक महिन्यांपासून रिक्त आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र हद्दीतील अंगणवाड्यांच्या नियोजनाची जबाबदारी असलेल्या पर्यवेक्षिकांची ११पैकी सहा पदे रिक्त असून सर्व ठिकाणचा कारभार प्रभारींवर सुरू आहे.

कर्जत तालुका कुपोषित बालके असलेला तालुका म्हणून चर्चेत राहिला आहे. ग्रामीण भागात कुपोषण कमी करण्यासाठी अंगणवाडी केंद्र असून या अंगणवाडी केंद्रामधून बालकांना, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांना पोषण आहार दिला जातो, मात्र त्या सर्व यंत्रणेवर तालुका स्तरावरून लक्ष देण्यासाठी असलेल्या प्रकल्प अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत.

तालुक्यात कर्जत १ आणि कर्जत २ अशी एकात्मिक बालविकास विभागाचे प्रकल्प असून त्यातील प्रकल्प एकमध्ये १६० अंगणवाड्या केंद्रांचा समावेश आहे. त्यांच्या प्रकल्पामध्ये सहा पर्यवेक्षिकांची मंजूर पदे असून सध्या चार पर्यवेक्षिका कार्यरत आहेत, तर प्रकल्प दोनमध्ये १७० अंगणवाडी केंद्र असून त्या अंगणवाडी केंद्रांसाठी पाच पर्यवेक्षिकांची पदे मंजूर असून त्यात केवळ एकमेव पर्यवेक्षिका कार्यरत असून चार पदे रिक्त आहेत.

तालुक्यात दोन प्रकल्प असून त्या दोन्ही प्रकल्पात समन्वयाची भूमिका बजावणारे विस्तार अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. तालुक्यातील दोन विस्तार अधिकाऱ्यांपैकी एका विस्तार अधिकाऱ्यांची बदली झाली असून एका विस्तार अधिकाऱ्याचे पद देखील रिक्त आहे. त्यामुळे एकात्मिक बालविकास प्रकल्प विभागाचा कर्जत तालुक्यातील कारभार सध्या रामभरोसे सुरू असल्याचे दिसते.

# उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी आमदार दरेकरांची स्थानिक प्रकल्पाला भेट

**महाड : प्रतिनिधी**

महाड, पोलादपूर हा दुर्गम असून आजही बहुतांश भाग विकासापासून वंचित आहे. रोजगार नाहीत म्हणून तरुण पुण्या-मुंबईत जात आहेत, मात्र याही परिस्थितीवर मात करुन प्रकल्प उभारणाऱ्या येथील तरुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आमदार प्रवीण दरेकर यांनी साखर येथील एका उद्योगाला भेट दिली.



महाड, पोलादपूर तालुके ऐतिहासिकदेखील आहेत. या ठिकाणी पर्यटनाला वाव आहे. किल्ले रायगड, माँ जिजाऊ समाधी पाचाड, दासबोध जन्मस्थळ शिवथरघळ, चवदारतळे, बौद्ध लेणी, तानाजी मालुसरे समाधी उमरठ, थंड हवेचे ठिकाण कुडपण, पावसाळ्यातील धबधबे अशी पर्यटनस्थळे विकसित करून रोजगार निर्मितीचा मानस आमदार प्रवीण दरेकरांचा आहे. याचबरोबर तरुणांनी छोटे छोटे उद्योग सुरू करावेत, त्यासाठी लागणारे कौशल्य प्रशिक्षण व आर्थिक पाठबळ आपण देऊ, असेही आमदार दरेकर यांनी सांगितले.

साखर या दुर्गम गावातीत तरुण उद्योजक गोविंद चोरगे यांच्या मिनरल बॉटलींग वॉटर प्लांटला त्यांनी भेट दिली. मातृभुमीतील या उद्योजगांना पुर्ण ताकद देऊन, ग्रामीण उद्योग पुढे आणण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे सांगत तरुणांनी आता पुढे यावे, असे आवाहन दरेकर यांनी केले.

# रेवदंड्याच्या श्रावणी घरतची अग्नीवीर म्हणून निवड

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा आंग्रेनगर येथील १९ वर्षीय श्रावणी जयवंत घरत हिची भारतीय नौदलामध्ये फायटर जेटमध्ये मिसाईल लोड करणे, उत्पादन व देखभाल विभागात एविएशन, (एअर ऑरडिनन्स) या पदावर अग्नीविर म्हणून कोची येथे निवड झाली आहे. तिच्या या निवडीचे कौतुक सर्व स्तरातून व्यक्त होत असून अलिबाग तालुक्यात प्रथम अग्नीवीर होण्याचा बहुमान तिने पटकाविला आहे.



श्रावणी घरत ही मिनिडोर मालक जयवंत विश्वनाथ घरत यांची मुलगी आहे. तिच्या आई-वडिलांनी तिला प्रोत्साहन दिले. तिचे दहावीपर्यंतचे शिक्षण रेवदंडा कोएसो माध्यमिक शाळेत तर बारावीपर्यंतचे शिक्षण कोएसो ॲड. नंदा देशमुख अलिबाग येथे पूर्ण केले आहे. तिने डिफेन्स परीक्षा व शारीरिक चाचणीची तयारी करीत असताना पीएनपी कॉलेजमध्ये कॉम्प्युटर सायन्स शाखेत प्रवेश घेतला. २०२३मध्ये भारतीय नौदलाच्या दोन परिक्षा, शारीरिक चाचणी व दोन मेडिकल चाचण्यांमध्ये ती उत्तीर्ण झाली. नोव्हेंबर २०२३ ते मार्च २०२४ दरम्यान चार महिन्याचे ट्रेनिंग पूर्ण केले.

तिची नौदलामध्ये फायटर जेटमध्ये मिसाईल लोड करणे, उत्पादन व देखभाल विभागात एविएशन, (एअर ऑरडिनन्स) या पदावर नियुक्ती झाली आहे. तिचा रेवदंडा मित्र मंडळाचे वतीने विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी संदीप खोत, संतोष जाधव, निलेश खोत, रोहन कारेकर, संदिप मोरे, रणजीत गुरव, अरूण विचारे आदी उपस्थित होते.

# खासदार सुनील तटकरे यांनी घेतले श्री धावीर महाराजांचे दर्शन

**रोहे : प्रतिनिधी**

महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड लोकसभा मतदारसंघासाठी खासदार सुनील तटकरे यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर त्यांनी रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांचे दर्शन घेतले. या वेळी त्यांचे रोहा शहरात ढोलताशा व फटाक्यांच्या आतिषबाजीने स्वागत करण्यात आले.

या वेळी त्यांच्यासमवेत त्यांची पत्नी वरदा तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, लालताप्रसाद कुशवाह, माजी सभापती रामभाऊ सकपाळ, माजी गट नेते महेंद्र गुजर, माजी उपनगराध्यक्ष महेश कोलटकर, अहमद दर्जी, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, निडीतर्फे अष्टमी उपसरप उत्तम नाईक, युवा नेते नवनीत डोलकर, वाशी उपसरपंच अरविंद मगर, माजी सरपंच ज्ञानेश्वर सांळुखे, रामाशेठ म्हात्रे आदी उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे हे रोह्यात येताच राष्ट्रवादी कार्यकर्त्यांकडून जंगी स्वागत करण्यात आले. कार्यकर्तांमध्ये उत्साह दिसून आला. रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर सामाजिक एकतेचे प्रतिक असलेल्या दर्गा बंदर येथे दर्गाला भेट दिली. शहरातील श्रीराम व मारूती मंदिरात जाऊन दर्शन घेतले. नेहमीप्रमाणे कुळकर्णी ओटीवर जात व्यापारी वर्गाची भेट घेत चर्चा करण्यात आली. या वेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.



# चैत्राची चाहूल लागताच वृक्ष झाले हिरवेगार

**खोपोली : प्रतिनिधी**

सध्या उन्हाचा चटका जाणवायला प्रारंभ झाला असला, तरी निसर्गाच्या सान्निध्यात असलेल्या वृक्ष हिरवेगार झाल्यांचे पहावयास मिळत आहे. तप्त उन्हात निसर्गाकडून सुरू असलेली रंगीबिरंगी फुलांची ही सृष्टी पाहून मनाला गारवा दिला जात आहे. निसर्गाच्या प्रकोपाने खचलेल्या बळीराजाला जणू जगण्याची नवी उमेद देण्यासाठी हा निसर्ग पुन्हा आपल्या आविष्काराची उधळण करीत असल्याचा भास परिसरात ठिकठिकाणी अनुभवायला येत आहे.



चैत्र महिन्याच्या स्वागतासाठी संपूर्ण निसर्ग बेचैन झाला आहे. फाल्गुन संपत, पानगळत सरली... निसर्गाच्या सान्निध्यात नवसंजीवनी पांघरली... ऋतुराजाची चाहूल, झाडावेलींना लागली... या ओळीचा प्रत्यय या परिसरात ठिकठिकाणी पहावयास मिळत आहे.

एकीकडे सूर्य आग ओकत असताना झाडांना फुटणारी कोवळी पाने मनाला गारवा देऊन जात आहे. तप्त उन्हात रूई, रिठा, कडूलिंब, आंबा, जांभूळ आदी झाडे पानाफुलांनी रंगून गेली आहेत. या झाडावर कोवळी पाने प्रत्येकाचे मन आकर्षिले जात आहे. ही चैत्राची उधळण बळीराजाला जगण्याची नवी उमेद देऊन जात आहे. ऋतुराजाच्या स्वागतासाठी निसर्ग श्रृंगार वाढवून सज्ज झाल्याचे चित्र पाताळगंगा परिसरात दिसत आहे.

# भक्तांना कौल देणारी चौलची शितळादेवी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील चौल या दक्षिणेकडील प्राचीन नगरात हिरव्या गर्द नारळ-पोफळीच्या छायेत आंबेपुरी पाखाडीत शितळादेवीचे भव्य दिव्य देवालय आहे. मंदिरास पौराणिक कथासार आहे.

चंपावतीनगरीत देवीची उपासक असलेल्या चंपावती राणीचे राज्य होते. नगराला समुद्राचा वेढा होता, समुद्राच्या लाटांनी चंपावती नगरीची तटबंदी सारखी तुटून नुकसान होत असे. त्यामुळे राणी हतबल होऊन दुःखी होई. अखेर राणीने एकांकात अनुष्ठानाला आरंभ केला. मौन व्रत पाळून देवीच्या उपासनेला सुरुवात केली. असे नवरात्रीतील आठ दिवस गेले, राणीच्या उपासनेला यश आले. प्रत्यक्ष शितळामाता प्रकट होऊन राणीला म्हणाली, चंपावती काय संकट आहे, सागरावर माझी सत्ता आहे. मला शितळामाता म्हणतात, त्यावर राणीने सागरापासून होणाऱ्या त्रासाबद्दलची कहाणी देवीला कथन केली. या सागराच्या संकटापासून नगरीचे रक्षण कर, असे सांगताच देवीने माझे शक्तीने सागराला शांत करीन असे म्हणत हातातील तुंबर सागरावर फेकला व सागर अडविला. सागर भयभीत होऊन शितलामातेला शरण आला व यापुढे या नगरीला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, असे वचन सागराने देवीला दिले. राणीने शितळामातेला राज्य करण्यासाठी सिंहासनी बसवले व पुजापात्र घेऊन मातेची पुजा करून निर्मळ गंगाजळ, हळद, कुंकू, आभुषणे, कनक, वस्त्र, श्रीफळ अर्पण केले. तेव्हापासून शितळामाता देवीचे स्थान या चंपावती नगरीत निर्माण झाले. शितलामातेला दरबार देवदेवतेचे माहेरघर आहे. देवदेवता मातेच्याा दर्शनासाठी येऊ लागल्या अशी पौराणिक कथा सांगितली जाते.



या मंदिराचा प्रथम जिर्णोद्धार इ. स. १७५८मध्ये बाबूभट उपाध्ये यांनी द्रव्य मिळवून केल्याची नोंद आहे. इ. स. १७६७मध्ये विसावी सरसुभेदार यांनी ब्राम्हण भोजन घातले. १७८५मध्ये एप्रिलच्या सुमारास राघोजी आंग्रे कुटूंब देवीच्या दर्शनास आले होते, तर १७९२च्या ऑक्टोबर महिन्यात मुलाबद्दलचा नवस फेडण्मासाठी आले होते. त्याप्रसंगी हत्ती, घोडे, संरजाम व काही लष्कर बरेच दिवस तळ ठोकून या ठिकाणी राहिले आहे. १८०५मध्ये बाबूराव आंग्रे दर्शनाला आल्याचा उल्लेख असून दरवर्षी दसर्याच्या दिवशी आंग्रे कुटूंब दर्शनाला न चुकता येई व देवीच्या रक्षकाचा मान देत असत. पुर्वीचे आंग्रेकालीन लाकडी कौलारू मंदिर पाडून त्या वास्तूतील मूर्तीची जागा न बदलता ग्रामस्थांनी जीर्णोद्धार समिती नेमून २७ मार्च १९९० रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुर्हुतावर नवीन वास्तू बांधण्यास सुरुवात केली. मार्च १९९७ मध्ये रायगडचे तत्कालीन जिल्हाधिकारी रघुनाथ राठोड यांचे हस्ते जिर्णोद्धाराचे काम पूर्ण झाल्याने मंदिराचा शुभारंभ करण्यात आला

श्री गोळबादेवी, भरडादेवी, या तिच्या उपदेवता आहेत. मंदिर परिसरात देवीची ओटी भरण्यासाठी साहित्य विक्री करण्यासाठी विक्रेते आहेत. नारळीपाक, चिक्की, तसेच बकुळीचे गजरे खरेदी करण्यासाठी महिलांची भाऊगर्दी असते. जागृत देवस्थानास भेट देण्यासाठी असंख्य भाविक येत असतात.


## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड पिन नं.४१०२०६

पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.२४४/२४४/२०२४

### जाहीर सुचना

**पनवेल महापालिकेतर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त चित्ररथ, निबंध व वत्कृत्व स्पर्धा आयोजन केलेबाबत.**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत ''भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर'' यांच्या १३३ व्या जयंती निमित्ताने **शाळास्तरावर** दि. ३ ते ६ एप्रिल, २०२४ या कालावधीत वक्तृत्त्व व निबंध स्पर्धांचे खालील दिलेल्या गटात व विषयानुसार आयोजन करावे व शाळेतील प्रथम तीन क्रमांक (प्रत्येक गटातील) यांची नावे दि. ०८/०४/२०२४ रोजी सकाळी १२.०० पर्यंत शिक्षण विभाग मनपा (लोकनेते दि. बा. पाटील पनवेल महापालिका शाळा क्र. ०१, दांडेकर हॉस्पीटल समोर पनवेल ) कार्यालयास सादर करावीत. यास्पर्धा तीन गटात घेतल्या जाणार असून तिन्ही गटांसाठी निबंध व वक्तृत्व स्पर्धेतील विषय खालीलप्रमाणे असतील.शाळास्तरावर प्रथम येणाऱ्या तीन क्रमांकांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्हाने गौरविण्यात येईल. तसेच मनपा स्तरावर प्रथम येणाऱ्या तीन क्रमाकांना रोख रक्कम,सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

| गट (इयत्तेनुसार) | निबंध स्पर्धा शब्द मर्यादा | वक्तृत्व स्पर्धा वेळ | विषय |
|---|---|---|---|
| ५ ते ७ | २०० शब्द | ३ मिनिटे | १) संविधानाचे भाग्यविधाते डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>२) माझी माय रमाई<br>३) भिमाचे बालपण |
| ८ ते १२ | ४०० शब्द | ५ मिनिटे | १) स्त्री मुक्तीसाठी डॉ. बाबासाहेब योगदान<br>२) मला भावलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर<br>३) महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर |
| खुला गट | ५०० शब्द | ७ मिनिटे | १) नवीन उद्योजकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रेरणास्थान<br>२) बुध्द आणि त्यांचा धम्म – सर्व समस्यांचे निराकरण<br>३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधानातिल योगदान |

महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत **बुधवार १० एप्रिल, २०२४** रोजी निबंध व वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन आयुक्त तथा प्रशासक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. या स्पर्धा लोकनेते दि. बा. पाटील पनवेल महापालिका शाळा क्र. ०१, दांडेकर हॉस्पीटल समोर पनवेल येथे सकाळी १०.३० वाजता घेतल्या जाणार आहेत. या स्पर्धा तीन गटात घेतल्या जाणार असून तिन्ही गटांसाठी विषय वरीलप्रमाणे असतील. निबंध व वक्तृत्त्व स्पर्धेसाठी शाळा स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका लोकनेते दि. बा. पाटील मनपा शाळा क्र.०१ मधील सहशिक्षिका वैशाली चेतन पाटील यांचेकडे दि. ०८/०४/२०२४ रोजी सकाळी १२.०० पर्यंत प्रथम तीन क्रमाकांची नावे द्यावीत. या स्पर्धेचा निकाल दि. १४ एप्रिल,२०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे मिरवणूक पूर्ण झाल्यानंतर घोषित करण्यात येईल. स्पर्धे संबंधीत अधिक माहितीसाठी सुजित म्हात्रे (९२२०९८२३१०) आणि वैभव पाटील (९९६७९१२०६८) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. तसेच दि १४/०४/२०२४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनावर आधारित चित्ररथ व लेझीम स्पर्धा आयोजित करण्यांत आलेल्या आहेत. या करिता दि. १०/०४/२०२४ पर्यंत प्रवेशिका लोकनेते दि. बा. पाटील पनवेल महापालिका शाळा क्र. ०१, दांडेकर हॉस्पीटल समोर येथे जमा कराव्यात.

**वरील स्पर्धेसाठीनियमव अटी आहेत :-**

१) स्पर्धेसाठी दि. १०/०४/२०२४ रोजी सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत (एक तास) असा असेल.
२) निबंध यापूर्वी कुठेही प्रसिध्द झालेला नसावा.
३) एका व्यक्तीस वरील गटानुसार एकाच विषयावर एकच निबंध लिहिण्याची अनुमती असेल.
४) सदरील निबंधात वैध संदर्भ असणे अनिवार्य राहील, वक्तृत्व स्पर्धा सकाळी १०.३० वाजता सुरू होईल.
५) एका व्यक्तीस वरील गटानुसार एकाच विषयावर वक्तृत्व करण्याची अनुमती असेल.
६) चित्ररथाची उंची जमिनीपासून १२ फूट राहील यांची दक्षता घेणे.
७) आचारसंहितेचा भंग होणार नाही यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित शाळेची राहील.

निबंध अथवा वक्तृत्व स्पर्धेचा निकाल दि.१४/०४/२०२४ रोजी जाहीर केला जाईल, निबंध अथवा वक्तृत्त्व स्पर्धेच्या निकालाबाबतचे पूर्ण अधिकार आयोजकांकडे राखीव राहतील, या स्पर्धा सर्व वयोगटांसाठी खुली राहील.

**सही/-**
**(रमेश उ. चव्हाण)**
शिक्षणाधिकारी
पनवेल महानगरपालिका

## निवडक

### पोलीस अधिकारी तरकसेंचे कौतुक

**नवी मुंबई :** पोलीस अधिकारी उत्तम तरकसे यांना नुकताच राज्य शासनाचा समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. याबद्दल राज्य पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी तरकसे यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली आहे. तरकसे यांनी शुक्ला यांची भेट घेतली. त्या वेळी शुक्ला यांनी तरकसेंचा साहित्यप्रवास जाणून घेतला तसेच त्यांच्या कल्पना ऐकत, कणखर पोलीस दलात हळव्या कवी मनाचा माणूस असल्याबाबत कौतुक करीत शुभेच्छा दिल्या.



### करंजाडेत आढळला एकाचा मृतदेह

**पनवेल :** पनवेलजवळील डोंबाळा कॉलेज रोडरील रेल्वे फाटकाच्या मागे एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्यांच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ६० ते ६५ वर्षे आहेत. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे फोन नंबर (०२२-२७४५२३३३) किंवा उपनिरीक्षक प्रियांका शिंदे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### देवीच्या पादुका चोरणाऱ्यांना अटक

**नवी मुंबई :** ठाकुर्ली कचोरे येथील गावदेवी मंदिरातील देवीच्या चांदीच्या पादुका चोरीला गेल्या होत्या. सीसीटिव्हीच्या आधारे पोलिसांनी या चोरट्यांचा शोध घेऊन तुर्भे येथून तिघांच्या मुसक्या आवळल्या आहेत. राजेश उर्फ राजू वंजारे (वय ३४), कैलास राजजग निषाद (वय ५४) आणि फारुख अली मोहम्मद हनीफ शेख (वय ३९) अशी अटक आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून पोलिसांनी चांदीच्या पादुका हस्तगत केल्या आहेत.

# वाशीजवळील उड्डाणपुलाखाली काम सुरू

## पाम बीच मार्गावर वाहतूक संथगतीने

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पाम बीच मार्गावरील सायन-पनवेल महामार्गाखालील वाशीजवळील उड्डाणपुलाखालील कामाला नुकतीच सुरुवात केली आहे. नेरूळहून वाशीकडे व वाशीहून नेरूळकडे अशा दोन्ही दिशेला वाशीजवळ उड्डाणपुलाखालील पाम बीच मार्गाची एक-एक मार्गिका खोदल्यामुळे पाम बीच मार्गावरील वाहतूक संथ गतीने होत आहे.



पालिका या ठिकाणच्या काँक्रीटीकरणाच्या कामासाठी जवळजवळ दोन कोटींपेक्षा अधिकचा खर्च करणार आहे. पाम बीच मार्गावर किल्ले गावठाण ते आरेंजा कॉर्नरपर्यंत विविध ठिकाणी असलेले छोटे पूल व जंक्शनच्या ठिकाणाच्या रस्त्याची मायक्रोसर्फेसिंगद्वारे दुरूस्ती करण्यात येत असून या कामासाठी वस्तू व सेवा करासह १० कोटी रुपये खर्च होणार आहेत.

पावसाळ्यात याच उड्डाणपुलाखाली मोठ्या प्रमाणात पाणी साचण्याचे प्रकारही घडतात. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेने या ठिकाणच्या रस्त्याचेही काँक्रीटीकरण करण्यास सुरुवात केली आहे. नेरूळ येथील सारसोळे चौकाजवळील छोट्या पुलाच्या ठिकाणचे मायक्रोसर्फेसिंगचे काम करण्यात आले आहे.

पाम बीच मार्गावर सातत्याने वाहनांची वर्दळ पहायला मिळते. त्यामुळे या मार्गावरील वाशी पुलाच्या खालील सुरू करण्यात आलेल्या काँक्रीटीकरणाच्या कामामुळे संथ गतीने वाहतूक सुरू आहे.

**पाम बीच मार्गावरील सायन-पनवेल हायवे पुलाखालील रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम करण्यात येत असून या पुलाखाली पावसाळ्यात सातत्याने पाणी साठण्याच्या घटना घडत असतात. त्यामुळे थीन व्हाईट टॉपिंग पद्धतीने हे काम करण्यात येणार आहे. या कामाबाबत व रहदारीबाबत ठेकेदाराला योग्य ती खबरदारी घेण्याचे सूचित करण्यात आले आहे.**

**-गिरीश गुमास्ते, कार्यकारी अभियंता, नवी मुंबई महापालिका**

## जे.डी. तांडेल यांची ओबीसी बहुजन पक्षाच्या राष्ट्रीय खजिनदारपदी निवड

**नवी मुंबई : वार्ताहर**



रायगड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध अर्थतज्ज्ञ, सीए आणि ओबीसी समाजाचे नेते जे.डी. तांडेल यांची ओबीसी समाजाच्या एकजुटीसाठी नव्याने स्थापन झालेल्या ओबीसी बहुजन पक्षाच्या राष्ट्रीय खजिनदारपदी निवड करण्यात आली असल्याची माहिती पक्षाचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाश शेंडगे यांनी दिली.

मुंबईत अलिकडेच मुंबई मराठी पत्रकार संघात झालेल्या पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणी व जिल्ह्याच्या नेत्यांच्या बैठकीत जे.डी.तांडेल यांची ही निवड करण्यात आली. तांडेल हे व्यवसायाने सीए आहेत तसेच ते अर्थतज्ज्ञ म्हणूनही प्रसिद्ध आहेत. राज्याचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर मुंबई दूरदर्शने प्रसारित केलेल्या अर्थसंकल्पावरील महाचर्चेत मुख्यमंत्री, अर्थमंत्री यांच्याबरोबर तांडेल यांनीही अनेकदा भाग घेऊन आपली मते मांडली आहेत. ओबीसी समाजाच्या उत्कर्षासाठी झालेल्या अनेक आंदोलनात त्यांचा प्रामुख्याने सहभाग होता. ते ओबीसी जनमोर्चा या सामाजिक संघटनेचे उपाध्यक्ष आहेत.

## पावणे येथे २०० झाडांवर पडणार कुऱ्हाड



### पर्यावरणवाद्यांची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**नवी मुंबई : बातमीदार**

एमआयडीसीच्या ठाणे-बेलापूर केमिकल उद्योगपट्ट्यातील पावणे येथील एकमेव मोकळ्या जागेतील तब्बल २०० झाडे प्रकल्पग्रस्तांना भूखंड तयार करण्यासाठी तोडण्यात येणार असल्याने पर्यावरणप्रेमी संताप व्यक्त करीत आहेत. सरकारने प्रकल्पग्रस्तांसाठी भूखंड वाटप करण्यास आमचा कोणताही आक्षेप नाही, मात्र हिरवा पॅच निर्दयीपणे पुसला जात आहे हे धक्कादायक आहे, नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले. कुमार यांनी मुख्यमंत्र्यांना झाडे वाचवण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

पीएपींना भूखंड देण्यात येत असल्याचे एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. मोकळी जागा मधून भूखंडाचा दर्जा बदलला जात असल्याने हे अयोग्य आहे असे नॅटकनेक्टने म्हटले आहे. अत्यंत प्रदूषित रासायनिक युनिट्सचे वर्चस्व असलेल्या संपूर्ण पावणे भागात हे एकमेव हिरवे फुफ्फुस आहे आणि ते वाचवले पाहिजे, कारण शहरी भागातील झाडे हवा फिल्टर करतात आणि हानिकारक कण काढून टाकतात, असे नॅटकनेक्टने म्हटले आहे. मैदानांसाठी निश्चित केलेली सर्व मोकळी जागा आणि जागा राज्य सरकारच्या मालकीच्या सिडकोच्या मालकीच्या नगररचनाकार सिडकोकडून लुटल्या जात आहेत. केवळ पाच टक्के जमीन विकसित व्हायची आहे आणि २०३८पर्यंत लोकसंख्या ३,७७,०००ने वाढण्याचा अंदाज असताना, नवी मुंबईने मोकळ्या जागा आणि हिरव्यागार फुफ्फुसांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे आणि काँक्रीट जिंगल्सचा विस्तार करू नये, असा युक्तिवाद कुमार यांनी केला.

एमआयडीसी आणि सिडको यांच्यामध्ये त्यांनी पीएपी सेटलमेंटसाठी योग्य योजना तयार करावी. औद्योगिक पट्टा आणि त्यानंतर नियोजित शहराची निर्मिती होऊन सहा दशके उलटूनही पीएपीचे पुनर्वसन करण्याचे काम शहर करत असल्याचे धक्कादायक आहे, अशी खंत पारसिक हील येथील पर्यावरणवादी विष्णू जोशी यांनी व्यक्त केली.

## साई माध्यमिक शाळेच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन

**कळंबोली : प्रतिनिधी**

शुभदा पॉलीमर्स प्रॉडक्टस प्रा. लि. यांच्या सीएसआर फंडातून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या पनवेल तालुक्यातील साई येथील सार्वजनिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या नूतन इमारत भूमिपूजनाचा समारंभ नुकताच कंपनीच्या संचालक फाल्गुनी झवेरी व स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौतुभ गावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

विद्यालयाची गैरसोय लक्षात घेऊन फाल्गुनी झवेरी यांनी शुभदा पॉलीमर्स प्रॉडक्टस प्रा. यांच्या माध्यमातून ११ वर्गखोल्या, खेळाची खोली, ग्रंथालय व स्वच्छतागृह असलेली दोन मजली इमारत बांधून देण्याची जबाबदारी स्विकारली.



या समारंभाला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर रायगड विभागप्रमुख प्रकाश हाके, निरीक्षक संजय महाजन, आजीवसेवक एस. आर. बेडगे, निरीक्षक एस. एच. पाटील, भोजकर, स्कूल कमिटी चेअरमन दामोदर विठु मोकल, प्रकाश पाटील, हेमंत पाटील, ज्ञानेश्वर मोरे, शाळेचे मुख्याध्यापक शशिकांत हबळे, साई पंचक्रोशीतील पालक वर्ग उपस्थित होते.

विद्यालयाचे मुख्याध्यापक शशिकांत हबळे यांनी प्रास्ताविक केले, तर सौ. गावंड व पी. आर. पाटील यांनी सूत्रसंचालन केले.





## पनवेल शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती

**पनवेल : वार्ताहर**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना नेते व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन मोरे यांची पनवेल उपमहानगर प्रमुखपदी तर अतुल मोकल यांची शिवसेनेच्या नवीन पनवेल शहर प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे.

पनवेल संपर्क प्रमुख राजेंद्र यादव, जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे यांच्या उपस्थितीत पनवेल उपमहानगर प्रमुखपदी सचिन मोरे यांची नियुक्ती करण्यात आली, तसेच संजय सावंत यांची पनवेल उपमहानगर संघटकपदी नियुक्ती करण्यात आली.

अतुल मोकल यांनी शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे तसेच शिवसेना महानगरप्रमुख पनवेल ॲड. प्रथमेश सोमण व पनवेल तालुका प्रमुख रुपेश ठोंबरे यांचे आभार मानले. या जबाबदारीचे मी भान ठेवून शिवसेना पक्षाच्या संघटना वाढीसाठी सतत काम करीत राहीन आणि हिंदुहृदयसम्राट व धर्मवीरांची हिंदुत्वाची शिकवण अशीच पुढे घेऊन जात राहीन, असे अतुल मोकल यांनी सांगितले.

## वंडर्स पार्कमधील व्यायाम साहित्याची जागा बदलण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरुळमधील नागरिकांनी वंडर्स पार्क येथील उद्यानात जिम इक्वीपमेंट बसविण्याची मागणी केली होती. वंडर्स पार्कमध्ये १६५० नागरिक पैसे भरून वॉकसाठी येत असतात. त्यांना व्यायाम करण्यासाठी योग्य ठिकाणी इक्वीपमेंट बसवावीत अशी मागणी केली होती त्यानुसार ती बसविलीदेखील होती, परंतु हे व्यायामाचे साहित्य ज्या ठिकाणी कोणीही जाऊ शकत नाही अशा ठिकाणी बसविली असल्याचा आरोप माजी सभागृह नेते रवींद्र इथापे यांनी केला आहे.

याबाबत वास्तुविशारदांनी ॲम्पी थिएटरच्यामागे व्यायामाचे साहित्य बसवावे असा अभिप्रायदेखील दिला होता, तरी ती जागा बदलून मध्यवर्ती ठिकाणी त्वरीत व्यायामाचे साहित्य बसवून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी इथापे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात केली आहे.

## विद्याभवनमध्ये जुनी टपाल तिकीटे, नाणी आणि नोटा यांचे प्रदर्शन

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नेरुळ येथील विद्याभवन संकुलात बुधवारी (दि.२७) एका आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी छंद वर्ग व त्याची कार्यशाळा घेण्यात आली. टाटा कंपनीत रसायने हाताळण्याच्या विभागात २० वर्षे सेवा करून निवृत्त झालेले उल्हास निळकंठ चोगले यांनी पोस्टाची तिकिटे व नाणी या छंदाविषयी माहिती सांगितली.



भारतीय पोस्टात तिकिटांची सुरुवात कधी झाली याचा इतिहास, तिकिटांचे स्मारक टपाल, सर्विस स्टॅम्प, कमोरेटिव्ह स्टॅम्प आदी तिकिटांची पीपीटीद्वारे माहिती, त्यांचे विविध प्रकार व आकार तसेच १९५७नंतरची व्यवहारातील स्मारक नाणी व प्रचारक नाणी याविषयी त्यांनी माहिती सांगितली. आपल्या आयुष्यात प्रत्येकाने छंद जोपासावा छंदातूनच आपल्याला ज्ञान मिळते, मनोरंजन होते व व्यक्तिमत्व विकास होतो, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

त्यांनी आणलेल्या विविध नोटांचे नाण्यांचे व तिकिटांचे प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी त्या प्रदर्शनाचा आनंद घेतला. या कार्यक्रमात संस्थेचे कुलसचिव दिनेश मिसाळ तसेच ज्येष्ठ नागरिक सामाजिक संस्थेचे सेक्रेटरी व उपाध्यक्ष प्रभाकर गुमास्ते, बालाजी श्रीजीचे सेक्रेटरी व गायक रघुनाथ शिंत्रे तसेच माध्यमिक मराठी विभागाचे मुख्याध्यापक गोरख कदम व शिक्षकवृंद उपस्थित होता. प्रभाकर गुमस्ते व रघुनाथ शिंत्रे यांच्या गायनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नूतन गवांदे यांनी केले.

## उन्हाळ्यात वन्यजीवांची तहान भागवण्यासाठी पाणवठे पुनर्जीवित

### 'फॉन'च्या कार्यकर्त्यांचा पुढाकार

**उरण : रामप्रहर वृत्त**

फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) चिरनेर या निसर्गप्रेमी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी धुळवडीनिमित्त जंगलात जाऊन तेथील वन्यजीव आणि प्राण्यांसाठी मृत झालेले पाणीसाठे पुन्हा जिवंत केले आहेत. त्यामुळे रखरखत्या उन्हाळ्यात या वन्यजीवांना प्यायला घोटभर पाणी मिळणार आहे.



उरणमधील जंगल परिसरातील वन्यजीव अधिवासातील पाण्याच्या मृत पावलेल्या झऱ्यांना नवसंजीवनी देण्याचे कार्य यामुळे झाले आहे. चिरनेर बापदेव परिसरातील पेरीचे पाणी या पाणवठ्यावर धुळवडीच्या दिवशी श्रमदान करून तिथे झऱ्यास पुनर्जीवित केले. या वेळी पाणवठ्यावर पाणी कमीच लागले. परिसरातील अनेक ठिकाणी पाण्याची पातळी घटली आहे. त्यामुळे या वर्षी वन्यजीव आणि जंगलातील प्राण्यांना उन्हाळ्यात पाण्याचे भयंकर दुर्भिक्ष असेल.

चिरनेर बापदेव परिसरातील पेरीचे पाणी या पाणवठ्याचा अनेक वर्षांपूर्वी तिथे असणाऱ्या आदिवासी कातकरी समाजाच्या वस्तीकडून पिण्याच्या पाण्यासाठी उपयोग होत होता, पण आता त्या पाणवठ्याचे पाणी तेथील आदिवासी बांधव वापरत नसल्यामुळे हा पाणवठा गाळाने बुजला गेला होता. फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन) चिरनेर या निसर्गप्रेमी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी धुळवडीच्या दिवशी श्रमदान करून तिथे झऱ्यास पुनर्जीवित केले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात वाहनाने स्कुटीला धडक दिल्याने यात २६ वर्षीय रोहित राजेश निर्मल याचा मृत्यू झाला. याप्रकरणी वाहन चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पेंधर येथे राहणारा रोहित निर्मल हा मित्रांसमवेत बाहेर फिरण्यासाठी स्कुटी घेऊन गेला होता. रात्री १२ वा. च्या सुमारास रोहितचा मित्र सचिन याने घरी येऊन रोहितचा अपघात झाला असल्याचे सांगितले. रोहित स्कुटी घेऊन नावडे फाट्याकडून तळोजा एमआयडीसीकडे जात असताना ब्रिजवर आला. या वेळी अज्ञात वाहनाने त्याच्या स्कुटीला धडक मारली. यात रोहित जखमी होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक वैद्यकीय मदत न करता पळून गेला आहे.

## १२४ गावांच्या सूचना, हरकती नोंदविण्यास सुरुवात

### नागरिकांना ३० दिवसांची मुदत




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शासनाच्या नगर विकास विभागाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यास नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्त करण्यासाठी शासन निर्णय जाहीर केला आहे. याबाबत १२४ गावांमधील ग्रामस्थ आपल्या सूचना आणि हरकती नोंदविण्यासाठी शेतकरी सहाय्यक संचालक, नगर रचना, कोकण विभागीय कार्यालय येथे बुधवारी (दि.२७) एकत्रित आले होते.

उरण तालुक्यातील १२४ गावांपैकी ३२ गावे खोपटा नवे शहर विभागात होती आणि त्यासाठी सिडको महामंडळ विशेष नियोजन प्राधिकरण होते तसेच एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन २०२० प्रमाणे त्या विभागाचे नियमन होत होते. नैना भाग-२ क्षेत्रातील ८० गावांसाठीसुद्धा सिडको विशेष नियोजन प्राधिकरण होते आणि त्याचा विकास आराखडा मंजूर आहे आणि त्या विभागातील जमिनीची मालकी कायमस्वरूपी जमीन मालकाकडे राहणार होती. एमएमआरडीएला नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्त केल्यामुळे १२४ गावांमधील जमिनी संपादित करण्यात येणार असल्याने सूचना, हरकती नोंदविण्यासाठी ग्रामस्थ एकत्र आले, तर नागरिकांना सूचना हरकती नोंदविण्याची ३० दिवसाची मुदत दिली असल्याचे नगर रचना सहसंचालक जितेंद्र भोपळे यांनी सांगितले.

## नवीन पनवेल येथे पेपर ज्वेलरीची कार्यशाळा

**पनवेल : वार्ताहर**

डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा नवीन पनवेल येथे शाळेच्या मुख्याध्यापिका श्रेया जाधव यांच्या संकल्पनेतून सस्टेनेबल व इकोफ्रेंडली पेपर ज्वेलरी बनविण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.



वजनाने हलक्या व नावीन्यपूर्ण अशा दीर्घा क्रिएशनच्या दागिन्यांना खूप मागणी आहे. प्राजक्ता दळवी (दीर्घा क्रिएशन) यांनी विद्यार्थ्यांना बनवता येतील अशा सोप्या व वैविध्यपूर्ण ज्वेलरी बनविण्याचे प्रशिक्षण दिले. नवीन कलाप्रकार शिकण्याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. बौद्धिक अक्षम विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या आधारे व्यवसायाच्या नवीन संधीचे दालन खुले झाले. अशा प्रकारच्या प्रशिक्षणामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवण्याच्या नव्या वाटा मिळतील, अशी प्रतिक्रिया सर्वत्र उमटत आहे. शाळेच्या या कार्याचे पालक व शाळेचे हितचिंतकांकडून कौतुक होत आहे.

# सहकारी पतसंस्थांचा मेळावा उत्साहात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आयोजित रायगड जिल्ह्यातील सहकारी पतसंस्थांचा मेळावा सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री उदय जोशी व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष अॅड.जे.टी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली अलिबाग येथे झाला.

या वेळी बोलताना सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री उदय जोशी यांनी, महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने जाहीर केलेल्या ठेव संरक्षण योजनेचा विविध पैलूंच्या माध्यमातून अभ्यास करून यशस्वीतेसाठी प्रयत्न करावेत. तोपर्यंत या योजनेला स्थगिती द्यावी, असे मत व्यक्त केले.



महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांनी चित्रफित सादर करून म्हटले की, या योजनेत प्राथमिक भाग भांडवल शासनाने टाकणे आवश्यक आहे. या योजनेचे नाव ठेव विमा संरक्षण महामंडळ असे असावे तसेच या योजनेला आयआरडीएची मान्यता घेण्यात यावी. या योजनेचे व्यवस्थापन सहकार, बँकिंग व पतसंस्था चळवळीतील तज्ज्ञांकडे द्यावे. योजना स्वीकारताना आरबीआयने नेमलेल्या जगदीश कपूर समितीचा अहवाल विचारात घ्यावा.

रायगड जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अॅड.जे. टी. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. या मेळाव्याला राज्य पतसंस्था फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील, रमेश नाईक, प्रमोद पाटील, सीताराम कवळे, रायगड जिल्हा पतसंस्था फेडरेशनचे उपाध्यक्ष दिलीप जोशी, संचालक दिलीप पटेल, हेमंत पाटील, जगदीश कवळे, चंद्रकांत घोसाळकर, नरेन जाधव, उषा चांदगावकर, कविता ठाकूर आदींसह जिल्ह्यातील विविध पतसंस्थांचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन रायगड जिल्हा फेडरेशनचे सचिव योगेश मगर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष दिलीप जोशी यांनी मानले.

# मुस्लिम समाज खासदार सुनील तटकरेंच्या पाठीशी

## राष्ट्रवादीचे शादाब गैबी यांचा दावा

**माणगाव : प्रतिनिधी**

विविध विकासकामांमुळे रायगड लोकसभेच्या निवडणुकीत मुस्लिम समाज हा खासदार सुनील तटकरे यांच्या पाठीशी ठाम असल्याचा दावा रायगड जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष शादाब गैबी यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केला.



रायगड लोकसभा मतदारसंघाची निवडणूक जाहीर झाली असून ७ मे रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे हे महायुतीत सहभागी झाल्याने मतदारसंघातील मुस्लिम समाज त्यांच्याबाबत नाराज असल्याचे बोलले जात आहे, परंतु याचे माणगाव येथे आपल्या कार्यालयात रायगड जिल्हा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष शादाब गैबी यांनी गुरुवारी (दि.२८) पत्रकारांशी संवाद साधताना खंडन केले.

युवा नेते शादाब गैबी म्हणाले की, खऱ्या अर्थाने गेल्या अनेक वर्षांपासून मुस्लिम समाजाचे विविध प्रश्न असतील, गावागावातील विकासकामे असतील किंवा मुस्लिम समाजाच्या अडीअडचणींवेळी तटकरेसाहेब व त्यांचे कुटुंबीय हे नेहमीच धावून आलेले आहेत. त्यामुळे मुस्लिम समाज हा नेहमीच तटकरेसाहेबांच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला आहे. विकासकामांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास न भुतो न भविष्यती असा विकास संबंध मतदारसंघाचा तटकरेसाहेबांच्या माध्यमातून झाला आहे.

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातही खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून भरपूर विकासकामे झाली आहेत. मागील २०१९च्या रायगड लोकसभा निवडणुकीत श्रीवर्धन मतदारसंघाने तटकरेसाहेबांना भरपूर मतांची आघाडी दिल्याने येथेच त्यांचा विजय निश्चित झाला होता. याची पुनरावृत्ती होऊन या वेळेस त्याहीपेक्षा अधिक मताधिक्य या मतदारसंघातून तटकरेसाहेबांना मिळेल, असा विश्वास शादाब गैबी यांनी व्यक्त केला.

बॅ. अंतुलेसाहेबांनंतर कोकणचे भाग्यविधाते म्हणून तटकरेसाहेबांचे नाव घेतले जाते. विरोधकांकडे प्रचाराचा कोणताही ठोस मुद्दा नाही. विकासकामांच्या बाबतीत ते बोलताना दिसत नाहीत. मुस्लिम समाज हा तटकरेंबद्दल नाराज असल्याच्या अफवा विरोधक पसरवत असून त्यात कोणतेही तथ्य नाही. विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरल्याने ते असे अपप्रचार करीत आहेत. या खोट्या प्रचाराचा कोणताही प्रभाव मुस्लिम समाजावर पडणार नसून फिर एक बार रायगड के खासदार तटकरेसाहाब, असा नारा गैबी यांनी या वेळी दिला.

# पेण रामवाडीत दोन दुचाकींची समोरासमोर झाली धडक; दोघे जखमी

**पेण : प्रतिनिधी**

पेणजवळील रामवाडी येथे दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दोघे जखमी झाले आहेत. अपघाताची नोंद पेण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत माहिती अशी की, पेण–वडखळ मार्गावर रामवाडी येथील वाहतूक पोलीस चौकीसमोर फिर्यादी नामदेव कृष्णा पाटील (रा. इंदिरानगर, वडखळ, ता. पेण) आणि त्यांच्या पाठीमागे बसलेला मित्र असे दोघे ज्युपिटर स्कुटी (एमएच ०६–सीएफ ३६०९) घेऊन वडखळ येथून पेण येथे चालले होते. त्या वेळी पेण बाजूकडून रेल्वे स्थानकासमोरील पुलाखालून चुकीच्या बाजूने येणारा हिरो पॅशन मोटरसायकल (एमएच ०६–बीए ४३४७)वरील चालकाने आपले ताब्यातील मोटरसायकल अतिवेगाने चालवून ज्युपिटर स्कुटीस ठोकर मारली. या अपघातात फिर्यादी व त्यांचा मित्र हे खाली पडून त्यांच्या लहान मोठ्या दुखापतीस तसेच स्वतःच्या डोक्यास गंभीर दुखापती होऊन स्कुटी व मोटरसायकलच्या नुकसानीस आरोपी कारणीभूत झाला. याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास हवालदार वेळे करीत आहेत.

# शिवप्रेमी मित्र मंडळाच्या शिवज्योतीचे मुरूडमध्ये स्वागत



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड खारआंबोली येथील शिवप्रेमी मित्र मंडळाचे २०० युवक शिवजयंतीनिमित्त रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा आशीर्वाद घेऊन शिवप्रतिमेसमोर ज्योत प्रज्वलित करून मुरूडकडे निघाले. ते पहाटे २ वाजता निघून मुरूड शहरात ११ वाजता पोहचले. या शिवज्योतीचे मुरूडकरांनी उत्सहात स्वागत केले.

सलग सात वर्ष हा उपक्रम राबवला जात आहे. उपक्रमात मंडळाचे चिंतामणी बेडेकर, गणेश गोसावी, संकेत म्हात्रे, अक्षय बेडेकर, दीपेश पेरवे, मंगेश खंडागळे आदी शिवप्रेमींचा सहभाग होता, तर २०० जणांमध्ये १० महिला होत्या.

खारआंबोली हे गाव शौर्य, खेळात कायम पुढे असते. तेथील युवावर्ग भजन, कीर्तन आणि वारकरी संप्रदायातील असून सच्चे शिवप्रेमी आहेत. शिवज्योत मुरूड शहरात आल्यावर भव्य स्वागत करण्यात आले. नंतर पालिकेत शिवरायांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून जुनी पेठ, अलंकापुरी येथील शिवप्रतिमेला नमन करून ज्योत मूळगावी म्हणजे खारआंबोली येथे नेण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीनुसार साजरी केली जाते. यामागे काही शिवभक्तांची अशी भावना आहे की, ज्या शिवरायांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केली. महाराज यांना वाटत होत की, जरी परकीय सालगणना असल्या तरी देशाची सलगणना सुरू व्हावी. त्यांनी शालीवन शकाची सुरुवात केली. तिथीला महत्त्व दिले. परकियांची संस्कृती जी येथे लादण्याचा प्रयत्न झाला होता. ते नाकारून प्राचीन संस्कृतीचा प्रतिनिधित्व केले तसेच महाराजांनी भाषा शुद्धीदेखील केली. म्हणून काही शिवभक्तांकडून शिवजयंती ही तिथीनुसार साजरी केली जाते.

# माणगावमध्ये संस्कृत भारतीचा वार्षिकोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

संस्कृत भाषेच्या प्रचार व प्रसारासाठी काम करणाऱ्या संस्कृत भारती कोकण प्रांत माणगाव बालकेंद्रम शाखेचा वार्षिक उत्सव शिपूरकर विद्यालयात उत्साहात झाला.

या कार्यक्रमास माणगाव नगरपंचायतीचे मुख्याधिकारी संतोष माळी, डॉ.बेडेकर दाम्पत्य, नगरसेविका नंदिनी बामगुडे, बालकेंद्र शिक्षिका नेहा केकाणे, जिल्हा प्रमुख रेणुका पिंपळापुरे, सतीश केकाणे, अजित शेडगे आदी उपस्थित होते.

या वेळी बालकेंद्रमच्या विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषेमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये संवाद, नाटिका, नृत्य, गीते इत्यादींचा समावेश होता. संस्कृत भाषेमध्ये संवाद, अभिनय व गीत गायन कौशल्य प्राप्त केल्याबद्दल मान्यवरांनी तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

यापुढेही माणगावमध्ये संस्कृत भाषा प्रशिक्षण वर्ग सुरू राहणार असून इयत्ता पहिलीपासून पुढील वर्गातील विद्यार्थी, प्रौढ या वर्गात प्रवेश घेऊन संस्कृत भाषा आत्मसात करू शकतात, असे आवाहन व्यवस्थापक यांनी केले आहे.

मागील एका वर्षापासून या बालकेंद्रमधील विद्यार्थी संस्कृत भाषेचे शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या संस्कृत भाषा कौशल्याचे सादरीकरण वार्षिक उत्सवाच्या निमित्ताने करण्यात आले.

या निमित्ताने मान्यवर व पालकांनी मनोगत व्यक्त करून बालकेंद्रमच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा केकाणे यांनी केले.



# बोरघाटात दोन ट्रकची धडक



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटात खोपोली बायपासजवळ नवीन बोगद्याखाली दोन ट्रकची धडक झाली. या अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.

ट्रक क्रमांक एम ४०–सीडी २०२९चा चालक अंजनी कुमार सिंग (रा. सालेमपूर, इसराइल) हा पुणे बाजूकडून मुंबई बाजूकडे तिसऱ्या लेनने जात असताना या वाहनाला पाठीमागून येणाऱ्या ट्रकने (आरजे १९–जीएफ ७२८५) ओव्हरटेक करून हा ट्रक पुढे येऊन स्लो झाला. त्यामुळे ट्रक (एम ४० सीडी २०२९) हा पाठीमागून ठोकर लागून अपघातग्रस्त झाला. अपघातामध्ये या ट्रकची केबिन तुटून दुसऱ्या लेनवर पडली, तर ट्रक (आरजे १९–जीएफ ७२८५)मधील कच्चा माल रस्त्यावर पडल्याने अर्धा तास वाहतूक ठप्प झाली होती. या ट्रकवरील चालक पळून गेला.

अपघातात दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे. महामार्ग पोलीस केंद्र बोरघाटचे उपनिरीक्षक संजय हेमाडे व कर्मचारी यांनी वाहतूक सुरळीत केली.

# निपुणोत्सव उत्साहात साजरा

## स्पर्धेतील पारितोषिक विजेत्यांचा गौरव

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेच्या आणि माणगाव पंचायत समितीच्या शिक्षण विभागामार्फत निपुण भारत अभियान अंतर्गत सुधाकर नारायण शिपूरकर शाळेच्या सभागृहामध्ये निपुण महोत्सवाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या वेळी प्रत्येक केंद्रातून नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले.

या शैक्षणिक कार्यक्रमास माणगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप जठार, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट उपस्थित होत्या.

या निपुण उत्सवात शिक्षकांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यासाठी माझी निपुण शाळा व असे झालो आम्ही निपुण हे विषय होते. स्पर्धेत तालुक्यातून प्रत्येक केंद्रातून एक असे एकूण २० शिक्षक सहभागी झाले होते. शिक्षकांच्या निबंध स्पर्धेतून व शैक्षणिक साहित्य निर्मितीच्या परिक्षणामधून प्रथम तीन क्रमांक काढण्यात आले.

निबंध स्पर्धेत अपूर्वा अमोल जंगम (कशेणे शाळा) प्रथम, गीतांजली शेळके (विकास कॉलनी शाळा) द्वितीय, तृतीय क्रमांक विजय गर्जे (राजिप शाळा बामणगाव) व विनायक होनगेकर (राजिप शाळा, भिनाड) यांनी पटकाविला. शैक्षणिक साहित्य निर्मितीमध्ये अपूर्वा अमोल जंगम (विघवली केंद्र) प्रथम, विजया सावंत (गांगवली केंद्र) द्वितीय व नंदकुमार पिंगळे (ढालघर केंद्र) यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांनी केले. गटविकास अधिकारी संदीप जठार यांनी येणाऱ्या शैक्षणिक वर्षात शिक्षण क्षेत्रात आपण कोणकोणते उपक्रम राबवून माणगावचा शैक्षणिक दर्जा वाढवू शकतो याबाबत चर्चा, मार्गदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक विजेत्या शिक्षकांना गौरविण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचायत समिती साधन व्यक्ती शृंगारी पाटील, प्रज्ञा म्हात्रे, प्रशांत नागे, राजेंद्र पाटील, स्वाती भुस्कुटे, दिपाली तांडेल, श्रेया डांगे, अनिल वाघमारे आदींनी मेहनत घेतली. शृंगारी पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कर्जतमध्ये प्रगत शेतकऱ्याने घेतले कडधान्याचे पीक

**कर्जत : प्रतिनिधी**

राजनाला कालवा परिसरातील वदप येथील शेतकरी विनय वेखंडे हे कर्जत तालुक्यातील प्रगत शेतकरी म्हणून ओळखले जातात. या वर्षी त्यांनी आपल्या शेतात कडधान्य पिकांची शेती केली आहे. त्यांच्या शेतात वाल, मूग, तुर, चणे यांची शेती बहरलेली असून त्यांच्या शेतातील सेंद्रिय जमिनीवर पिकवलेल्या कडधान्यांना नवी मुंबईतील बाजारात चांगला बाजारभाव मिळवत आहेत.

कर्जतच्या पूर्व भागात वदप येथे विनय वेखंडे यांची शेती आहे. त्या ठिकाणी दरवर्षी साधारण १५ एकर जमिनीवर वेगवेगळ्या प्रकारची शेती करतात. भात शेतीबरोबर या वर्षी त्यांनी मोठ्या प्रमाणात कडधान्य शेती केली. वाल, तुर, मूग, मटकी,



हरभऱ्याची लागवड त्यांनी साधारण सहा एकर जमिनीवर केली होती. त्यात वालाच्या गावठी बियाण्याचा वापर करून दोन एकर जमिनीवर, आणि तुरडाळीचे उत्पन्न घेण्यासाठी गावठी तुरीचे बियाणे एक एकरात रूजवले होते. त्याचवेळी हिरव्या मुगाची दोन एकरात शेती केली, तर घरगुती वापरासाठी हरभरा आणि मटकी यांचीदेखील लागवड वेखंडे यांनी आपल्या शेतात केली.

नोव्हेंबर महिन्यात या सर्व शेतीसाठी ट्रॅक्टरद्वारे नांगरणी करून बियाण्यांची पेरणी केली. मार्च महिन्यात त्यांच्या शेतामधून तब्बल ५०० किलो वालाचे उत्पादन निघाले असून तुरडाळीसाठी वापरली जाणाऱ्या तुरीचे उत्पादन काढणीवर आहे. तेदेखील साधारण २०० किलो उत्पादन होईल असा कयास तालुका कृषी अधिकारी अशोक गायकवाड आणि मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी यांनी व्यक्त केला आहे, तर दोन एकर जमिनीवर टाकलेल्या बियाण्यामधून तब्बल ५०० किलो मुगाचे उत्पादन झाले आहे. हरभरा शेतीमधून झालेले चण्याचे उत्पादन हे आपल्या नातेवाईक यांच्यासाठी वेखंडे यांनी राखीव ठेवले आहे.

वालाच्या शेंगांची पोपटी विशेष लोकप्रिय असते आणि त्यासाठी गावठी वालाची शेंगा खरेदी करण्यास खवय्ये हे वदप येथे येऊन कच्च्या शेंगा खरेदी करायचे. त्याचबरोबर गावठी वालाची उसळही चविष्ट असते. त्यामुळे महिलावर्ग गावठी वाल आपल्या घरी साठवून ठेवत असतात. या वालाला मोठी मागणी असून सर्व वाल विनय वेखंडे यांनी नवी मुंबईतील बाजारात विकण्यास पाठवला आहे. बाजारात गावठी वाल हा साधारण १८० ते २०० रुपये किलोने विकला जात आहे. मूगदेखील मोठ्या विक्रीसाठी उपलब्ध असून हिरव्या मुगाला मोठी मागणी आहे. आजपर्यंत ४०० किलो मूग नवी मुंबईत विक्रीसाठी पाठविण्यात आला असून तुर काढणीनंतर त्याचीदेखील विक्री वेखंडे करणार आहेत. अशा प्रकारे त्यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत प्रयोग यशस्वी केले आहेत.

# जयदीप पाटील तटरक्षक दलातून सेवानिवृत्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील जयदीप जयवंत पाटील हे भारतीय तटरक्षक दल (इंडियन कोस्ट गार्ड)मधून ३८ वर्षे दोन महिने देशाची सेवा करून सेवानिवृत्त झाले. याबद्दल त्यांना विभागाकडून निरोप देण्यात आला.



वाघ्रण हे गाव कमी लोकसंख्येचे असले तरी सुशिक्षित व्यक्तींचे गाव समजले जाते. शेकडोच्या वर शिक्षक, २५पेक्षा जास्त वकील, डझनावर डॉक्टर, इंजिनिअर या गावाने दिले आहेत. या बरोबरच देशसेवेचे व्रत घेतलेले तरुणही या गावात पहायला मिळतात. गावातील जयदीप पाटील यांनी वडील शिक्षक असताना त्याचे अनुकरण करण्याऐवजी आपले महाविद्यालयीन शिक्षण झाल्यावर देशाची सेवा करण्याचे ठरविले व भारतीय तटरक्षक दलात काम करून आपल्या परिवाराबरोबरच गावाचे ही नाव उज्ज्वल केले.

सेवानिवृत्त झाल्यावर डिपार्टमेंटच्या वतीने जयदीप पाटील यांना निरोप देण्यात आला, तर महाशिवरात्रीच्या दिवशी १८ गाव संघटनेच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

# हैदराबादने मुंबईला धू धू धुतले!

## आयपीएलमधील सर्वोच्च धावसंख्येसह साकारला विजय

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये बुधवारी खेळल्या गेलेल्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादने मुंबई इंडियन्सचा ३१ धावांनी पराभव केला. या सामन्यात हैदराबादने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत तीन गडी २७७ धावा साकारत आयपीएल इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या नोंदवली. प्रत्युत्तरात मुंबईचा संघ २० षटकांत पाच बाद २४६ धावाच करू शकला.

या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता, पण हैदराबाद संघाच्या सर्वच फलंदाजांनी मुंबईच्या गोलंदाजांची



यथेच्छ धुलाई केली. ज्यामध्ये सर्वांत पुढे नाव होते हेन्रिक क्लासेनचे. क्लासेनने सर्वाधिक नाबाद ८० धावांची खेळी केली. त्याने ३४ चेंडूंचा सामना करताना सात षटकार आणि चार चौकार लगावले. अभिषेक शर्माने ६३ आणि ट्रॅव्हिस हेडने ६२ धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्याचबरोबर मार्करमने नाबाद ४२ धावा केल्या, ज्यामुळे हैदराबाद संघाला आयपीएलच्या इतिहासातील सर्वांत मोठी धावसंख्या उभारण्यात यश आले.

२७८ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या मुंबई संघाची चांगली सुरुवात झाली. रोहित शर्मा आणि इशान किशन यांनी पहिल्या विकेटसाठी ५६ (२० चेंडू) धावांची भागीदारी केली, पण संघाला पहिला धक्का चौथ्या षटकात इशानच्या रूपाने बसला, जो १३ चेंडूंत दोन चौकार आणि चार षटकारांनिशी ३४ धावा काढून बाद झाला. त्यानंतर मुंबईने रोहित शर्माच्या रूपाने दुसरी विकेट गमावली, जो पाचव्या षटकात एक चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने २६ धावा (१२ चेंडू) करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर तिलक वर्मा आणि नमन धीर यांनी तिसऱ्या विकेटसाठी ८४ धावांची (३७ चेंडू) भागीदारी केल्याने चाहत्यांच्या आशा पुन्हा एकदा उंचावल्या, पण ही भागीदारी नमन धीरच्या (३० धावा) विकेटने संपुष्टात आली. यानंतर १५व्या षटकात तिलक वर्मा पॅव्हेलियनमध्ये परतला, त्याने ३४ चेंडूंत दोन चौकार आणि तीन षटकार लगावत ६४ धावा केल्या. यानंतर १८व्या षटकात कर्णधार हार्दिक पांड्या २४ धावा करून बाद झाला. टीम डेव्हिडने शेवटपर्यंत उभे राहून २२ चेंडूंत दोन चौकार आणि दोन षटकारांसह नाबाद ४२ धावा केल्या.

## मुंबईला धक्का; सूर्यकुमार आणखी काही सामन्यांना मुकण्याची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली खेळणारा मुंबई इंडियन्सचा संघ अजूनही विजयाचा नारळ फोडू शकलेला नाही. स्पर्धेतील पहिल्याच सामन्यात मुंबई इंडियन्स संघाला गुजरात टायटन्सकडून पराभवाचा सामना करावा लागला, तर दुसऱ्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादनेही मुंबई इंडियन्सवर विजय मिळवला आहे. दरम्यान या दुहेरी धक्क्यानंतर मुंबई इंडियन्सला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. सूर्यकुमार यादवबाबत बातमी समोर आली आहे.

सूर्यकुमार यादव सुरुवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये खेळताना दिसून आला नव्हता. त्याला राष्ट्रीय क्रिकेट अकादमीकडून अजूनही फिटनेस सर्टिफिकेट मिळालेले नाही. त्यामुळे त्याच्या खेळण्यावर प्रश्नचिन्ह आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार सूर्यकुमार यंदाच्या आयपीएलमधील आणखी काही



सामन्यांमधून बाहेर होऊ शकतो, मात्र याबाबत कुठलीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

सूर्यकुमार यादव संघात नसणे ही मुंबई इंडियन्स संघासाठी चिंता वाढवणारी बाब आहे, कारण त्याने अनेकदा जबाबदारी घेत मध्यक्रमात फलंदाजीला येऊन मोठी खेळी केली आहे. त्याच्या अनुपस्थितीत मधल्या फळीतील फलंदाजांकडून हवे तसे योगदान मिळत नाहीये तसेच मुंबई इंडियन्स संघात सूर्यकुमारसारखा जबाबदारी घेऊन सामना जिंकून देणारा इतर फलंदाज नाही.

रोहित शर्मा आणि हार्दिक पांड्याच्या अनुपस्थितीत सूर्यकुमार यादवला दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेत भारतीय संघाचे नेतृत्व करण्याची संधी दिली गेली होती. या मालिकेतील तिसऱ्या सामन्यादरम्यान सूर्यकुमार दुखापतग्रस्त झाला होता. या दुखापतीमुळे त्याला मैदान सोडावे लागले. तेव्हापासून तो मैदानापासून दूर आहे. त्याच्या दुखापतीवर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

## नागोठण्यात रंगणार दिवस रात्र क्रिकेट स्पर्धा



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे क्रिकेट असोसिएशन आयोजित नागोठणे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन वेलशेत येथील जाखमाता क्रिडांगणावर २९ व ३० मार्च रोजी दिवस रात्र पद्धतीने करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन २९ मार्च रोजी दुपारी ३ वाजता आमदार अनिकेत तटकरे व भाजप युवा नेते प्रसाद भोईर यांच्या हस्ते होणार आहे.

या स्पर्धेत किशोर म्हात्रे, संजय भोसले, सुभाष पाटील, संतोष कोळी, महेश नरे, सुभाष मढवी, विशाल म्हात्रे, रोशन बावकर, अरुण चोगले, किशोर मांडलुस्कर, अरुण घोगरे आदी मालकांचे आठ संघ सहभागी होणार आहेत तसेच ही स्पर्धा सालाबादप्रमाणे घेतली जाणार असल्याची माहिती असोसिएशनचे अध्यक्ष राजेश पिंपळे यांनी दिली.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नागोठणे क्रिकेट असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रसाद भोईर, किशोर म्हात्रे, अनिल डाकी, विनय गोळे, अध्यक्ष राजेश पिंपळे, उपाध्यक्ष सुधीर भोय, सचिव गिरीष मढवी, सहसचिव सुनील बडे, सदस्य स्वप्नील भोसले, जयेश बावकर, विशाल म्हात्रे, निलेश पिंपळे, प्रमोद चोगले, अमोल ताडकर आदी पदाधिकारी व सदस्य मेहनत घेत आहेत.

## हैदराबादची खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल होती

### पराभवानंतर पांड्याची प्रतिक्रिया

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये पहिल्या सामन्यात मुंबई इंडियन्सला गुजरात टायटन्सकडून पराभव पत्करावा लागला होता. त्यानंतर बुधवारी दुसऱ्या सामन्यात मुंबईचा हैदराबादविरुद्धही पराभव झाला, ज्यामुळे मुंबई इंडियन्स संघ गुणतालिकेत नवव्या स्थानावर आहे. या पराभवावर हार्दिक पांड्याने प्रतिक्रिया दिली आहे.

मुंबई इंडियन्सने यंदाच्या आयपीएलमध्ये हार्दिक पंड्याला आपला कर्णधार बनवले, मात्र आतापर्यंत त्याच्या नेतृत्वाखाली संघाची कामगिरी खराब झाली आहे. पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबईचा सलग दुसरा पराभव झाला.

हैदराबादविरुद्ध संघ हरल्यानंतर पांड्या म्हणाला, वास्तविक सनरायझर्स हैदराबाद संघ २७७ धावा करेल, असे आम्हाला वाटले



नव्हते. विरोधी संघाने एवढी मोठी धावसंख्या उभारली म्हणजे त्यांनी चांगली फलंदाजी केली. गोलंदाजांसाठी ही खेळपट्टी चांगली नव्हती. खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल होती, ज्यामुळे जवळपास ५०० धावांचा पाऊस पडला.

आपल्या संघाचा बचाव करताना हार्दिक पंड्या म्हणाला, आमच्याकडे तरुण गोलंदाजीचे आक्रमण आहे आणि आम्ही शिकू. मुंबईने या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा १७ वर्षीय युवा वेगवान गोलंदाज क्वेना मफाकाला पदार्पण करण्याची संधी दिली. या सामन्यात मफाकाने चार षटकांत ६६ धावा दिल्या. यावर पांड्याने म्हटले की, युवा क्वेना मफाका चांगला वेगवान गोलंदाज आहे, पण त्याला अजून काही सामने खेळण्याची गरज आहे.


### नेतृत्वावर प्रश्नचिन्ह

**मुंबई** : हैदराबादविरुद्धच्या सामन्यात मुंबईचा कर्णधार हार्दिक पांड्याचे सुमार नेतृत्व पहायला मिळाले. नाणेफेक जिंकून पांड्याने हैदराबादच्या संघाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. या निर्णयावर अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. संघातील महत्त्वाचा गोलंदाज असलेल्या जसप्रीत बुमराहला पॉवर प्लेमध्ये केवळ एकच षटक दिले. त्यानंतर बुमराहला थेट १२व्या षटकात गोलंदाजीसाठी पाचारण करण्यात आले. तोवर ११ षटकात हैदराबादच्या फलंदाजांनी १६०हून अधिक धावा फटकावल्या होत्या. हार्दिककडून अशा अनेक चुका झाल्या, ज्याचा हैदराबादच्या फलंदाजांनी पुरेपूर फायदा उचलला आणि मुंबईच्या गोलंदाजांची धुलाई करीत विक्रमी २७८ धावांचा पर्वत उभा केला. यामुळे पांड्याच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## पंजाबविरुद्धच्या विजयानंतर विराटने मारली शिखरला मिठी

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने यंदाच्या आयपीएलमध्ये पंजाब किंग्जचा पराभव करून पहिला विजय नोंदवला. या विजयात विराट कोहलीचा महत्त्वाचा वाटा होता, ज्याने ७७ धावांची



शानदार खेळी केली. त्याच्या या कामगिरीसाठी त्याला सामनावीर म्हणूनही निवडण्यात आले. आता विराट कोहलीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये तो सामना संपल्यानंतर पंजाब किंग्सचा कर्णधार शिखर धवनला मिठी मारताना दिसत आहे.

सामना गमावल्यानंतर शिखर धवन निराश दिसत होता. या वेळी विराट धवनकडे गेला आणि त्याला मिठी मारली, असे व्हिडीओमध्ये दिसत आहे. यानंतर विराट त्याला काहीतरी बोलताना दिसला. या दोघांमध्ये काही मजा-चेष्टा झाली आणि दोन्ही फलंदाज हसताना दिसले. विराटची ही शैली चाहत्यांना खूप आवडली आहे. सोशल मीडियावर अनेक यूजर्सनी याबद्दल कमेंट्सही केल्या आहेत.

## ऋतुराजच्या नेतृत्व कौशल्याने प्रशिक्षक हसी प्रभावित

**चेन्नई : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये यंदा प्रथमच कर्णधारपदाची धुरा सांभाळण्याची जबाबदारी आल्यावर ऋतुराज गायकवाडने दोन सामन्यांतच क्रिकेट जाणकारांच्या नजरा आपल्याकडे वळवल्या आहेत. आधी माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी ऋतुराजच्या नेतृत्व कौशल्याचे कौतुक केले. आता चेन्नई सुपर किंग्ज संघाचे फलंदाजी प्रशिक्षक मायकल हसी यांनी ऋतुराजमधील कर्णधाराला शंभर टक्के गुण दिले आहेत. ऋतुराज हा क्रिकेट जाणणारा माणूस असल्याचे हसी म्हणाले.

'संघाने अचूक खेळाडूची कर्णधारपदी नियुक्ती केली आहे. ऋतुराज विलक्षण आहे. तो सामन्याची चांगली तयारी करतो. सामन्यापूर्वी प्रशिक्षक फ्लेमिंग आणि धोनीबरोबर डावपेचांवर चर्चा करण्यासाठी एकत्र येतो,' असे हसी यांनी सांगितले.

ऋतुराजने कर्णधार म्हणून निश्चित छाप सोडली आहे, असे मत व्यक्त करताना हसी म्हणाले, ऋतुराज हा क्रिकेट जाणणारा माणूस आहे. तो ज्या पद्धतीने क्षेत्ररक्षणाची व्यूहरचना करतो ते



बघितले की, त्याची मानसिकता स्पष्ट होते. गोलंदाजांनाही तो स्पष्ट संदेश देतो. विशेष म्हणजे त्याला संघ सहकाऱ्यांकडून चांगला पाठिंबा मिळत आहे.

हसी यांनी धोनीला फलंदाजीला न पाठविण्याचेदेखील समर्थन केले. मुळात खेळण्यासाठी खूप चेंडू नव्हते आणि समीर रिझवी चांगला फलंदाज आहे. फिरकी गोलंदाजीचा सामना करण्याची त्याच्याकडे क्षमता आहे. त्याने ती सिद्ध करूनदेखील दाखवली. धोनीच्या आधी त्याला संधी देणे हा संघ व्यवस्थापनाचा निर्णय होता, असे हसी म्हणाले.

गेल्या वर्षीपासून आयपीएलमध्ये वापरला जाणारा प्रभावी खेळाडू (इम्पॅक्ट प्लेअर) या नियमामुळे धोनीचा फलंदाजीचा क्रम बदलला असे हसी यांनी सांगितले. या नियमामुळे आम्हाला अधिक वेगवान खेळणाऱ्या फलंदाजाचा उपयोग करून घेता येतो. यामुळे आम्ही धोनीचा फलंदाजीसाठी आठवा क्रमांक निश्चित केला. अर्थात, यामुळे चाहत्यांची धोनीला फलंदाजी करताना बघायची प्रतीक्षा लांबली,' असेही हसी म्हणाले.

### शिवम दुबेचेही कौतुक

या वेळी चेन्नई सुपर किंग्ज संघाचे फलंदाजी प्रशिक्षक मायकल हसी यांनी शिवम दुबेचेही कौतुक केले. ते म्हणाले, शिवमच्या फलंदाजीत कमालीची सुधारणा केली आहे. आखूड टप्प्याचे चेंडू शिवमला खेळता येत नाही असे म्हटले जात होते, मात्र त्याने आपल्या फलंदाजीत कमालीची सुधारणा केली. विशेष म्हणजे त्याच्या प्रगतीवर धोनीचे लक्ष होते. शिवम आता गोलंदाजांना काही तरी नवे करून दाखविण्यास भाग पाडतो. हा सर्वात त्याच्या फलंदाजीत पडलेला मोठा फरक आहे.

## माद्रिद स्पेन मास्टर्स स्पर्धेत पी.व्ही. सिंधूची विजयी सलामी

**माद्रिद : वृत्तसंस्था**

भारताची शटलरक्वीन पी.व्ही. सिंधू हिने माद्रिद स्पेन मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेमध्ये विजयी सलामी दिली. सिंधूने कॅनडाच्या वेन यू झँग हिच्यावर सरळ दोन गेममध्ये विजय मिळवत पुढल्या फेरीत प्रवेश केला.



पी.व्ही. सिंधूला मागील स्पर्धेमध्ये उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. तिला जागतिक क्रमवारीत ४९व्या स्थानावर असलेल्या वेन यू झँग हिचा सामना करावयाचा होता. पहिल्या गेममध्ये झँगकडून प्रतिकार मिळाला, मात्र ब्रेकनंतर सिंधूने झोकात पुनरागमन केले. सिंधू-झँग यांच्यामध्ये १४-१४ अशी बरोबरी झाली. त्यानंतर सिंधूने मागे वळून बघितले नाही. भारताच्या फुलराणीने हा गेम २१-१६ असा जिंकला.

दुसऱ्या गेममध्ये भारताच्या अनुभवी सिंधूच्या झंझावाती खेळासमोर झँगचा निभाव लागला नाही. सुरुवातीला ४-४ अशी आघाडी असलेल्या या गेममध्ये सिंधूने त्यानंतर ११-६ अशी आघाडी घेत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. झँग हिला दबावाखाली आपला खेळ उंचावता आला नाही. अखेर सिंधूने या गेममध्ये २१-१२ अशी बाजी मारली. तिने ३० मिनिटांमध्ये या लढतीत विजय साकारला.

## धडाकेबाज अभिषेक शर्माने हैदराबादसाठी रचला इतिहास

### मोसमातील जलद अर्धशतक झळकावले

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल सामन्यात सनरायझर्स हैदराबादचा स्फोटक फलंदाज ट्रॅव्हिस मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांवर वर्चस्व गाजवताना दिसला. त्याने अवघ्या १८ चेंडूंत या मोसमातील सर्वांत जलद अर्धशतक झळकावले, ज्यामुळे आंद्रे रसेल मागे पडला, मात्र काही मिनिटांनंतर युवा फलंदाज अभिषेक शर्माने हेडचा हा विक्रम मोडीत काढला.



आतापर्यंत यंदाच्या आयपीएलमध्ये सर्वांत जलद अर्धशतक झळकावण्याचा विक्रम कोलकाता नाईट रायडर्सचा स्फोटक अष्टपैलू खेळाडू आंद्रे रसेलच्या नावावर होता. हैदराबादविरुद्धच्या सामन्यात त्याने अवघ्या २० चेंडूंत अर्धशतक केले, पण रसेल आता मागे पडला आहे. ट्रॅव्हिस हेडने १८ चेंडूंत अर्धशतकी खेळी केली. यानंतर अभिषेक शर्माने कहर केला. त्याने अवघ्या १६ चेंडूंत अर्धशतक झळकावले.

अभिषेक शर्मा हैदराबादसाठी सर्वांत जलद अर्धशतक झळकावणारा फलंदाज ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम डेव्हिड वॉर्नरच्या नावावर होता. हैदराबादकडून खेळताना वॉर्नरने २० चेंडूंत दोनवेळा अर्धशतक झळकावले होते, पण ट्रॅव्हिस हेडने त्याला मागे सोडले आणि नंतर काही वेळाने तोही मागे पडला.

## पहिल्याच चेंडूवर षटकार मारून समीरने शब्द केला पूर्ण

**चेन्नई : वृत्तसंस्था**

पहिल्याच आयपीएल सामन्यात राशीद खानच्या गोलंदाजीवर षटकार खेचणाऱ्या समीर रिझवीच्या कुटुंबाचा एक व्हिडीओ समोर आला आहे. समीर आयपीएलमध्ये खेळण्यासाठी जाताना सांगून गेला होता की, आयपीएलमधील पहिल्या चेंडूवर मी षटकार लगावणार. रिझवीने अगदी म्हटल्याप्रमाणेच केले आणि त्याच्या घरच्यांनी शेअर केलेल्या त्याच्या या व्हीडिओमध्ये याचा उल्लेखही आहे.

एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्जकडून कारकिर्दीतील पहिला चेंडू खेळताना समीर रिझवीने अवघ्या सहा चेंडूंमध्ये १४ धावांची झटपट खेळी केली. या सहा चेंडूंमध्ये त्याने दोन चेंडूवर षटकार मारत सर्वांनाच प्रभावित केले.

समीर रिझवी जगासमोर शानदार पदार्पण करीत असताना उत्तर प्रदेशातून त्याचे कुटुंब टीव्हीवर हा क्षण आनंदाने जगत होते. समीरच्या प्रत्येक षटकारावर टाळ्यांचा कडकडाट होत होता. मागून घरातील सर्वांची कॉमेंट्रीही चालू होती. दरम्यान, त्याचा भाऊ सबूल रिझवीने व्हिडीओ पोस्ट केला आहे, ज्यात चेन्नई सुपर किंग्जचा समीर रिझवी त्याच्या आयपीएल कारकिर्दीच्या पहिल्याच चेंडूवर षटकार लगावणार हे ठरवूनच गेला होता. टीव्हीवर सामना पाहणाऱ्या सबूलने समीरच्या शानदार फलंदाजीचा व्हिडीओ इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे.

चेन्नई सुपर किंग्जने या यूपीच्या फलंदाजाला ८.४ कोटी खर्चून संघात घेतले. तेव्हापासून तो चर्चेत आहे. चेन्नईने त्याला इतके पैसे खर्चून संघात का घातले हे जाणून घेण्यासाठी सर्वच त्याची फलंदाजी पाहण्यासाठी उत्सुक होते. जेव्हा शिवम दुबे बाद झाला तेव्हा प्रेक्षक एमएस धोनीला पाहण्याची अपेक्षा करत होते, पण रिझवी मैदानात आला आणि या युवा फलंदाजाने आपल्या आयपीएल कारकिर्दीतील पहिल्याच चेंडूवर उत्कृष्ट गोलंदाज राशिद खानला षटकार खेचताच प्रेक्षकांचा उत्साह द्विगुणित केला.

## मफाकाच्या नावावर लाजिरवाणा विक्रम



**नवी दिल्ली** : मुंबई इंडियन्स संघाने हैदराबादविरुद्धच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा १७ वर्षीय युवा वेगवान गोलंदाज क्वेना मफाकाला आयपीएलमध्ये पदार्पण करण्याची संधी दिली, मात्र मफाकाने गोलंदाजी करताना चार षटकात ६६ धावा दिल्या. त्याला एकही विकेट मिळाली नाही आणि या काळात त्याचा इकॉनॉमी रेटही १६.५०होता.

आयपीएल पदार्पणातील कोणत्याही गोलंदाजाची ही सर्वांत खराब गोलंदाजी आहे. आयपीएलच्या इतिहासात पदार्पणातील ही सर्वांत खराब आकडेवारी आहे. मफाकाने या बाबतीत मायकेल नेसरचा विक्रम मोडला आहे. नेसरने आयपीएल २०१३मध्ये पंजाब किंग्जकडून पदार्पण करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध गोलंदाजी करताना चार षटकांत ६२ धावा दिल्या होत्या.

जीवेत् शरदः शतम्!
रुपाली गावंड
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
निलम मुकादम

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com